







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २८.०७.२०२५ | अंक नं. १०१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020












## शनिशिंगणापूर देवस्थानचे उपकार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांची घरात गळफास घेऊन आत्महत्या



नगर - नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर येथील श्री शनेश्वर देवस्थानचे माजी विश्वस्त आणि सध्याचे उप कार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांनी राहत्या घरी छताला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना २८ जुलै रोजी सकाळी उघडकीस आली.

नितीन शेटे यांनी आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला असून, आत्महत्येमागील कारणांचा शोध घेतला जात आहे. स्थानिक प्रशासन आणि देवस्थान मंडळाकडूनही या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. तपास पूर्ण झाल्यावरच आत्महत्येचे नेमके कारण समोर येईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे. शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात या आत्महत्येच्या घटनेप्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरु आहे.

मागील काही दिवसांपासून शनी शिंगणापूर संस्थान विविध मुद्यांमुळे चर्चेत आहेत. महिनाभरापूर्वी ११४ मुस्लिम कर्मचारी घेतल्यामुळे संस्थानच्या विश्वस्त मंडळावर आरोप करण्यात आले होते. त्यानंतर या कर्मचाऱ्यांना काढण्यात आले होते. त्यानंतर देवस्थानचे बनावट ॲप्स तयार करून पैशांची अफरातफर केल्याचा आरोप देखील झाला होता. या प्रकरणात सध्या चौकशी सुरु होती.

वास्तविक नितीन शेटे यांनी आत्महत्या का केली? याबाबत अद्याप खुलासा झालेला नाही. मात्र, विश्वस्त मंडळाने केलेल्या अनियमिततेबाबत एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु असतानाच शेटे यांनी आत्महत्या केल्याने या अपहाराशी याचा संबंध आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

नितीन शेटे हे माजी आमदार शंकरराव गडाख यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जात होते. ते संस्थानमध्ये उपकार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत होते. मात्र, अनियमितता समोर आल्यानंतर हे विश्वस्त मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतर आता शेटे त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही तरी देखील यासंदर्भात शनी शिंगणापूर आणि परिसरात अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत. पोलिसांनी अद्याप या घटनेबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. त्यामुळे चौकशीत काय समोर येणार? हे पहावे लागेल.

## ५०० रुपयांच्या बनावट नोटांसह दोघा तरुणांना नगरमध्ये अटक; गाडीसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

नगर - भारतीय चलनाच्या ५०० रुपयांच्या हुबेहूब बनावट नोटा छापून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघा तरुणांना नगर तालुका पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्याकडून बनावट नोटा, महिंद्रा कंपनीच्या थार गाडीसह सुमारे १७ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नगर-सोलापूर महामार्गावर रुईछत्तीसी गावच्या शिवारात २७ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. सोमनाथ माणिक शिंदे (वय २५, रा. तपोवन रोड, नगर) व निखील शिवाजी गांगर्डे (वय २७, रा. कोंभळी, ता. कर्जत) असे पकडलेल्या दोघांची नावे आहेत.

नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांना गोपनीय माहिती मिळाली की, रुईछत्तीसी परिसरात २ इसम एका महिंद्रा थार गाडीत भारतीय चलनातील ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेवून त्या खऱ्या असल्याचे भासवून व्यवहार करण्यासाठी येत आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी रात्र गस्त पथकाला बोलावून घेत पथकासोबत ते रुईछत्तीसी गावच्या शिवारात रात्री १० वाजण्याच्या सुमारास जावून सापळा लावून थांबले, काही वेळातच संशयित थार गाडी


(पुढील मजकूर पान २ वर)





जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या व कालबाह्य झालेल्या चारचाकी वाहनांवर कारवाई करावी

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - शहरात कालबाह्य झालेल्या चारचाकी वाहनांद्वारे सर्रासपणे अवैध प्रवासी वाहतूक केली जात आहे. ही अतिशय धोकादायक वाहतूक त्वरित थांबवून या वाहनांवर कारवाई करावी अशी मागणी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याबाबत जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य प्रकाश रासकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. यामध्ये म्हंटले आहे की, सध्या अहिल्यानगर शहरामध्ये १५ वर्षापुर्वीच्या तीनचाकी प्रवासी ॲटो रिक्षांवर सदर रिक्षा कायमस्वरुपी स्क्रॅप करण्याची कारवाई सुरु असुन सदर कारवाई ही स्वागतार्ह आहे. तथापी, अहिल्यानगर शहरामधील माळीवाडा बस स्थानक व पुणे बस स्थानक या दोन ठिकाणी बसस्थानकाच्या गेटवरुन सुमारे १५ वर्षापुर्वीचे कायदेशीरदृष्टया कालबाहय झालेल्या चारचाकी टॅक्सी (काळया-पिवळया) वाहनामधुन अवैध प्रवासी वाहतुक राजरोसपणे सुरु आहेत. यातील बऱ्याच वाहनधारकांकडे प्रवासी वाहतुक करण्याचा परवाना देखील नाही.

सदर ठिकाणाहुन खाजगी गाडयांमधुन प्रवासी वाहतुक करण्यात येत आहे. तसेच काही वाहने ही अत्यंत वाईट अवस्थेत म्हणजेच मोडकळीस आलेली असुन त्यामधील इंधनाचा मोठया प्रमाणात धुर होऊन प्रदुषण देखील होत आहे. तर काही काळया पिवळ्या टॅक्सी वाहने ही नियमाप्रमाणे १५ वर्षे कालावधी पुर्ण केलेली व नियमाप्रमाणे स्क्रॅप होणारी असतांनाही सदर वाहनांमधुन मंजुर आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवुन जिवघेणा प्रवास होत असतांना दिसुन येत आहे. सदरील अवैध प्रवासी वाहतुक ही बसस्थानकाच्या अगदी गेटवरुन सुरु आहे. काही वाहने तर बसस्थानकाचे आत मध्ये देखील जाऊन प्रवासी भरत असल्याचे चित्र आहे.

वास्तविक पाहता नियमानुसार वैध प्रवासी वाहतुकीकरीता बसस्थानकाचे २०० मीटर दूर अंतरावर वाहने थांबवुन प्रवासी वाहतुक करणे आवश्यक आहे. तथापी प्रवासी वाहतुकीचे सर्व नियम पायदळी तुडवुन दादागीरीने जुनाट कालबाहय वाहनातुन प्रवाशांचा जीव धोक्यात घालुन अवैध प्रवासी वाहतुक सुरु आहे हे सर्व राजरोसपणे सुरु असतांना यावर नियंत्रण ठेवणारी शहर वाहतुक शाखा नक्की काय करते असा प्रश्न निर्माण होतो. तर काही वेळा त्यांचे आर्शिवादानेच हे सर्व अनधिकृतपणे चालु असल्याचे सर्वसामान्य नागरीकांना वाटते. सदरील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सदर ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन सार्वजनिक जिवीतास देखील धोका निर्माण होत आहे.

तरी सद्यस्थितीत कालबाहय झालेल्या रिक्षांवर होत असलेल्या कारवाईच्या धर्तीवर माळीवाडा बसस्थानक व पुणे बसस्थानक या ठिकाणाहुन उपरोक्त प्रमाणे कालबाहय झालेल्या वाहनातुन होणारी अवैध प्रवासी वाहतुक तात्काळ बंद करण्यात यावी व नियमानुसार कालबाहय झालेल्या प्रवासी टॅक्सी (काळी-पिवळी) तसेच खाजगी वाहने ही जप्त करुन नियमानुसार स्क्रॅप करण्यात यावीत अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
'मुसाफिर' - ९८२२०२०६९१

### नागपंचमीच्या सणी...उत्साही त्या साऱ्या जणी...




पाऊस व श्रावण आला की साऱ्या जणी महिला वर्गाला आनंदाचे उधाण येते. त्या तन मन सजवून, व्रतवैकल्याच्या साहाय्याने शारिरीक सौंदर्यासह मानसिक शांती, समाधान, मिळवण्याच्या उत्साहाने प्रयत्न करतात व आपल्या कुटुंबियांना सुद्धा प्रोत्साहित करतात.

या सणोत्सवाचा शुभारंभ होतो नागपंचमीने. ज्योतिष, अध्यात्मातील माननीय श्रीराम भट यांनी या नागपंचमीचे आगळे वेगळे अध्यात्मिक महत्त्व सांगितले आहे.

देव, दानव (राक्षस) आणि मनुष्य या तिन्ही गणांतून हे विश्व आविष्कारीत होत असते. त्यातील मनुष्य ही जात किंवा हा समाज स्वार्थाचे राजकारण करीत किंवा साधत, देव किंवा राक्षसांना सोयीनुसार जवळ करत आपला लाभ उठवतो, त्यानुसार क्रिया प्रतिक्रिया करत असतो.

म्हणूनच माणूस हा एक स्पर्श आहे. हा स्पर्श दैवीही असू शकतो वा राक्षसीही असू शकतो. म्हणूनच माणसातील राक्षस जागा होऊन त्याच्यातील दिव्य स्पर्शाचा डंखही होऊ शकतो. स्पर्श व डंख यात फरक आहे. माणसाचा हळुवार स्पर्शही होत असतो तसेच माणूस दुसऱ्याला चिमटाही काढू शकतो. सध्या माणसावर विषाचा सूक्ष्मपणे अंमल होतो किंवा तो वाढत जात माणूस सतत विषारी होत त्याचे आजूबाजूचे वातावरण, पर्यावरणही भयग्रस्तता वाढवत गढूळ करीत आहे.

नाग व साप यात फरक आहे. नागलोकाचा शिव व विष्णू या देवतांशी संबंध येतो. कश्यप ऋषींचे पुत्र असलेले अनंत (शेष), वासुकी, तक्षक, कर्कोटक, पद्म, महापद्म, शंख व कुलिक असे ८ नाग अध्यात्मिक मनोधारणेशी संबंधित आहे. त्यामुळे ते सर्व विश्वनिर्मितीच्या मुळाशी संबंधित आहेत. ते विशिष्ट तीर्थक्षेत्राचे क्षेत्रपाल होऊन राहतात. आपल्या जीवनाला अमृतमय स्पर्श होण्यासाठी या राक्षसी कलियुगात शेषशायी महाविष्णुचे स्मरण ठेवत कामक्रोधांना आवरत मानवतेचा दिव्य स्पर्श घेण्याचा प्रयत्न करावा. महालक्ष्मी-महाविष्णुचे स्मरण करीत (मानसिक) नागपूजन करावे.



नगरमध्ये गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# नगरमध्ये गावठी कट्टा, ६ काडतुसांसह तरूणाला पकडले

नगर - शहरात अवैधरित्या गावठी कट्टा बाळगणार्याा नेवासा येथील एका तरूणाला कोतवाली पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. सचिन पांडुरंग घोरतले (वय ३८,रा. नेवासा) असे त्याचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून गावठी कट्टा व सहा जिवंत काडतुसे असा सुमारे ५१ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने २६ जुलै रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास केली.

कोतवालीचे पो.नि. प्रताप दराडे यांना गोपनीय माहिती मिळाली होती की शहरातील झेंडीगेट परिसरात एक इसम गावठी कट्टा विक्री साठी येणार आहे. ही माहिती मिळाल्यावर त्यांनी लगेच कारवाई साठी पोलिस पथक पाठविले. या पथकाने संशयिताचा शोध सुरु केल्यावर रात्री ९.३० च्या सुमारास एमएसईबी ऑफिसच्या गेटकडून कानडे मळ्याकडे जाणार्या. रस्त्यावर नगर कॉलेजच्या भिंतीच्या पाठीमागे, दादा पीर दर्याच्या समोर एक जण संशयित रित्या वावरताना दिसला, त्याच्या संशयास्पद हालचाली पाहिल्यानंतर पथकाने संशयित आरोपीला पकडले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ६ जिवंत काडतुसे आणि मॅगझीनसह गावठी कट्टा आढळून आला. त्याच्या विरुद्ध पोलीस अंमलदार सलीम शेख यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पो.नि. प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. कुणाल सपकाळे, उपनिरीक्षक गणेश देशमुख, कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, सलीम शेख, विनोद बोरगे, सुर्यकांत डाके, अभय कदम, सत्यजित शिंदे, अमोल गाडे, अतुल काजळे, सोमनाथ केकाण, महेश पवार शिरीष तरटे, सचिन लोळगे, दत्तात्रय कोतकर, प्रतिभा नागरे, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली आहे.

# दौंड-मनमाड रेल्वे दुहेरीकरणासाठी उखळगाव येथील ३.३० हेक्टर राखीव वनजमिनीच्या हस्तांतरणास मंजुरी

## प्रकल्पाला कार्यारंभाची परवानगी; वन (संवर्धन) अधिनियमांतर्गत केंद्र शासनाची तत्वतः मान्यता



नगर - उखळगाव (ता. श्रीगोंदा) येथे दौंडमनमाड रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी ३.३० हेक्टर राखीव वनजमिनीचे हस्तांतरण केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या मंजुरीनंतर अधिकृतपणे मान्य करण्यात आले आहे. या कामासाठी केंद्र शासनाने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ अंतर्गत २७ अटींच्या अधीन राहून तत्वतः मान्यता दिली असल्याची माहिती उप मुख्य अभियंता (बांधकाम) सागर चौधरी यांनी दिली.

उप वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी संबंधित प्रकल्प यंत्रणेकडून सर्व अटींची पूर्तता झाल्याची खात्री करून अहवाल पाठविला होता. नागपूर येथील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांनी काही मुद्यांची पूर्तता मागितली होती, त्यानंतर तीही पूर्ण करण्यात आली.

प्रकल्प यंत्रणेकडून पर्यायी वनीकरणाचा खर्च, नक्त वर्तमान मूल्य (एनपीए), वन्यजीव संवर्धन आराखडा यासाठी आवश्यक कॅम्पा निधी जमा केला गेला आहे.

मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांचेकडून कार्यारंभ आदेश (जा.क्र. कक्ष-३/जमीन //प्र.क्र. १०८/ ९९८/२०२५-२६ दिनांक २१/०७/२०२५) डॉ. जितेंद्र रामगांवकर, मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांनी उप मुख्य अभियंता (निर्माण), दौंड यांना प्रकल्प सुरू करण्याची कार्यारंभ परवानगी काही अटींवर दिली आहे.

सदर अटी मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या तत्वतः मंजुरीतील अटींचे पूर्ण पालन करणे, वन्यजीव संवर्धन आराखडा आणि निमल पॅसेज प्लानची प्रभावी अंमलबजावणी, प्रकल्पांतर्गत वृक्षतोड करता येणार नाही, मजुरांचे तात्पुरते निवास शेड वनक्षेत्रात उभारता येणार नाहीत, आदेश १ वर्षासाठी वैध राहील, आदेशाची प्रत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सूचना फलकावर लावण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तर प्रकल्प कार्यान्वयनात वन (संवर्धन) अधिनियमाचे उल्लंघन झाल्यास कठोर वैधानिक कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### स्थानिक तपशील (अनुसूचीप्रमाणे)

अ.क्र. गाव तालुका जिल्हा सर्व्हे / गट क्र. लांबी रुंदी (मी.) वैधानिक दर्जा क्षेत्र (हे.)
१ - उखळगाव श्रीगोंदा अहमदनगर ४६९ ६६० ५० राखीव वन ३.३०

# फायनान्स कंपनीच्या एंजटकडून २५ लाख रुपयांची फसवणूक; तणावातून शेतकऱ्याची आत्महत्या

नगर - श्रीराम फायनान्सकडून लिलावातील वाहन खरेदी करण्यासाठी २५ लाख रूपये दिल्यानंतरही वाहन न मिळाल्याने व पैसेही परत न मिळाल्यामुळे एका शेतकर्या ने मानसिक तणावात येऊन विषारी औषध सेवन करून आत्महत्या केल्याची घटना वडगाव गुप्ता (ता. नगर) येथे घडली आहे. सोपान जगन्नाथ गिते (रा. धुमाळ वस्ती, वडगाव गुप्ता) असे आत्महत्या केलेल्या शेतकर्या चे नाव आहे.

दरम्यान, सदरची घटना ८ जुलै रोजी घडली असून यासंदर्भात मयत सोपान गिते यांच्या पत्नी मिनाबाई सोपान गिते (वय ६०,रा. धुमाळ वस्ती, वडगाव गुप्ता) यांनी २६ जुलै रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी श्रीराम फायनान्सच्या रिकव्हरी एजंटसह तिघांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. श्रीराम फायनान्सचा रिकव्हरी एंजट योगेश मोहन कापसे (रा. बाराबाभळी, ता. अहिल्यानगर), एन. के. भुजबळ (पत्ता माहिती नाही) व पवन रमेश भालेराव (रा. चेतना कॉलनी, एमआयडीसी, अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

सोपान गिते यांनी लिलावातील वाहन खरेदी करण्यासाठी श्रीराम फायनान्सशी संबंधीत तिघांना २५ लाख रूपये दिले होते. मात्र, संबंधित फायनान्स कंपनीकडून ना वाहन मिळाले ना पैसे परत. त्यातून सुरू झालेल्या मानसिक तणावामुळे आणि संशयित आरोपींच्या धमक्यांमुळे शेवटी त्यांनी ८ जुलै रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास विषारी औषध सेवन करून जीवन संपवले. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी करीत आहेत.

## डॉ. अरुण मांडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - सावेडीतील रहिवासी विज्ञानकथा लेखक डॉ. अरुण विनायक मांडे (वय ८०) यांचे २८ जुलै रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. त्यांचे मरणोत्तर देहदान करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी निर्मला मांडे असा परिवार आहे. आकाशवाणीसाठी अनेक नभोनाट्ये लिहिली होती. त्यांना अनेक साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

## पद्माबाई छाजेड यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - शिरुर येथील १९१९ रेव्हेन्यु कॉलनीतील रहिवासी पद्माबाई मोहनलाल छाजेड (वय ८२) यांचे २७ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर घोडनदी, शिरुर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

पद्मबाई या ॲड. दिनेश, सतिश छाजेड व सौ. मिना अभय पगारिया यांच्या मातोश्री तर मनिष लोढा, शांतीलाल लोढा यांच्या त्या आत्या तसेच कांतीलाल व वसंत लोढा यांच्या बहीण होत.

## पाटीलबा ठोकळ यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - कामरगाव येथील हभप पाटीलबा गणपत ठोकळ (वय १००) यांचे २७ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कामरगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वाडेगव्हाण येथील सभापती गणेश शेळके यांचे ते आजोबा होत.

## कंचनबाई बुरड यांचे संथाराव्रतत निर्वाण



नगर - पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथील कंचनबाई मांगीलाल बुरड (वय ८७) यांचे संथाराव्रतात निर्वाण झाले. त्यांनी २६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. यांच्याकडून हे व्रत धारण केले होते.

त्यांच्या पश्चात मुले वर्धमान, पारसमल व शांतीलाल, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पत्ता विचारण्याचा बहाण्याने महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले

## सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवर दुचाकीस्वाराकडून पुन्हा चेन स्नॅचिंग; गुन्हा दाखल

नगर - मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या एका वृध्द महिलेला एक अनोळखी इसमाने थांबवून पत्ता विचारण्याचे बहाण्याने अडवले आणि त्यांच्या गळ्यातील सुमारे ४ तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून नेले. ही घटना सावेडी उपनगरातील गुलमोहर रस्त्यावरील संकल्प हॉटेलसमोर दळवी मळा परिसरात २६ जुलै रोजी सकाळी ७:१५ वाजताच्या सुमारास घडली.

याबाबत मंगला दगडू सोनवणे (वय ७१, रा. ए-२८, गुलमोहर कॉलनी, दळवी मळा, गुलमोहर रस्ता, सावेडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी मंगला सोनवणे सकाळी नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडल्या असताना एक अनोळखी इसमाने काळ्या रंगाच्या दुचाकीवर येऊन त्यांना थांबवले. पत्ता विचारण्याचे निमित्त करत त्याने संवाद साधण्याचा प्रयत्न केला आणि अचानक त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून चोरून नेले.

घटनेनंतर मंगला सोनवणे यांनी तात्काळ तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेतली. शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, महिला सहाय्यक निरीक्षक कल्पना चव्हाण व उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व अन्य तांत्रिक पुरावे तपासून संशयित आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ५०० रुपयांच्या बनावट नोटांसह दोघा तरुणांना नगरमध्ये अटक

(पान १ वरुन)

(क्र. एम एच १६ डी एल २७९७) त्यांना येताना दिसली. पोलिसांनी ती गाडी थांबविली असता त्यात सोमनाथ शिंदे व निखील गांगर्डे हे बसलेले दिसले. पोलिसांनी पंचांच्या समक्ष त्यांची झडती घेतली असता सोमनाथ शिंदे याच्या खिशात ५०० रुपयांच्या १०० बनावट नोटा आढळल्या. तर निखील गांगर्डे याच्या खिशात ५०० रुपयांच्या ६० बनावट नोटा आढळल्या. त्या चलनात आल्या असत्या तर त्यांचे मूल्य ८० हजार एवढे झाले असते. पोलिसांनी त्या बनावट नोटा, दोघांकडील मोबाईल सोमनाथ शिंदे याच्या खिशातील १०, २०, ५०, १००, २०० रुपयांच्या २ हजार ८७० रुपये किंमतीच्या खऱ्या नोटा, थार गाडी असा १७ लाख ३७ हजार ८७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून दोघांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी पो.हे.कॉ. खंडेराव शिंदे यांच्या फिर्यादी वरून सोमनाथ शिंदे व निखील गांगर्डे या दोघांच्या विरोधात भारतीय न्यास संहिता २०२३ चे कलम १७९, १८०, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ट्रक चालकाला तिघांकडून मारहाण

नगर - शहरातील कपडिया ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ट्रकच्या दरवाज्यावरून सुरू झालेल्या वादाचे पर्यवसान थेट मारहाणीत होऊन एका ट्रक चालकावर हल्ला करण्यात आला. या हल्लयात चालक असलम अब्दुल सत्तार शेख (वय ५४ रा. झेंडीगेट, अहिल्यानगर) हे जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. २५ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास श्रीराम पेट्रोल पंप, अप्पूहत्ती चौक परिसरात ही घटना घडली.

दरम्यान, त्यांनी उपचारावेळी पोलिसांना दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात २६ जुलै रोजी रात्री उशिरा अब्दुल बंगाली, त्याचा मुलगा सलमान शेख आणि साथीदार शेहबाज शेख (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला असून अधिक तपास महिला पोलीस अंमलदार कविता गडाख करीत आहेत.

# गुटखा व सुगंधी तंबाखूची वाहतूक करणारी कार पकडली; ४ लाखाच्या मुद्देमालासह एकाला पोलिसांनी घेतले ताब्यात



गुटखा व सुगंधी तंबाखू वाहतूक करणारी कार पकडल्यानंतर मुद्देमालासमवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर - महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधित असलेली सुगंधी तंबाखू व विमल गुटखा विक्री करण्याचे उद्देशाने बाळगुन कार मधून वाहतूक करणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी सापळा रचून पकडले. त्याच्याकडून ८९ हजार ७१२ रुपये किमतीची सुगंधी तंबाखू व विमल गुटखा, एक कार व मोबाईल असा ३ लाख ९९ हजार ७१२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मार्केटयार्ड ते आनदंऋषीजी हॉस्पीटल रोडवर पॉलिटेक्नीक कॉलेजसमोर २७ जुलै रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

कोतवाली पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन पोलिसांनी मार्केटयार्ड ते आनदंऋषीजी हॉस्पीटल रोडवर पॉलीटेक्नीक कॉलेज समोर जावुन सापळा लावला असता रात्री ११.३० वाजता स्विप्ट कार येताना दिसली. पोलिसांनी कारचालकाला इशारा करुन कार थांबण्यास सांगीतले. कारचालक शरद अर्जुन पवार (वय ३०, रा. कौडगाव जांब, ता. नगर) याने कार थांबविल्यावर पोलिसांनी कारची झडती घेतली. त्यावेळी कारच्या पाठीमागील सीटवर सुगंधित तंबाखुचे पोते व पाकीटे दिसुन आले. पोलिसांनी त्याच्या कडील ३ लाख रुपये किमतीची मारुती कंपनीची स्वीफ्ट कार (क्र.एम एच १६ ए बी ३२९७), ८१ हजार रुपये किमतीची विमल गुटख्याच्या पुड्यांची बॅग, ८ हजार ७१२ रुपये किमतीची सुगंधी तंबाखू, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा ३ लाख ९९ हजार ७१२ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. हा माल कोणास विक्री करतो असे विचारले असता हा धंदा माझाच आहे. गाडीत भरलेला माल मी विक्री करण्याकरीता घेवुन चाललो आहे असे सांगीतले. पोलिसांनी मुद्देमालासह शरद पवार यास ताब्यात घेतले.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ केकाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शरद पवार याचे विरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस उप निरीक्षक शितल मुगडे हे करीत आहेत

सदरची कारवाई पो.नि. प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक शितल मुगडे, उपनिरीक्षक गणेश देशमुख, गुन्हे शोध पथकातील उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, सलीम शेख, विनोद बोरगे, सुर्यकांत डाके, अभय कदम, सत्यजित शिंदे, अमोल गाडे, अतुल काजळे, सोमनाथ केकाण, महेश पवार, शिरीष तरटे, सचिन लोळगे, दत्तात्रय कोतकर, प्रतिभा नागरे, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### असा सुटेल पोटात गुडगुडण्याचा आवाज

पोटातून गुडगुडण्याचा आवाज येणे ही एक सामान्य समस्या आहे, जी बहुतेकदा भूक, गॅस किंवा पचनाशी संबंधित कारणांमुळे उद्भवते. जरी ते गंभीर नसले तरी ते कधीकधी अस्वस्थ करते. पोटातील आवाज हे बहुतेकदा उपासमारीचे लक्षण असते. अशा परिस्थितीत एकाच वेळी जड अन्न खाऊ नका. दिवसातून ४-६ वेळा थोडे थोडे जेवण करा. यामुळे तुमचे पोट भरलेले राहील आणि आवाजापासून आराम मिळेल. राजमा, चणे, कोबी, तळलेले पदार्थ किंवा अन्न खाल्ल्यानंतर लगेच चहा किंवा कॉफी घेतल्याने गॅस होऊ शकतो. जर हा आवाज गॅसमुळे येत असेल तर त्यापासून दूर राहा. जेवल्यानंतर १५-२० मिनिटे हलके फिरायला जा. यामुळे पचनक्रिया सक्रिय होते आणि गॅस, ॲसिडिटी सारख्या समस्यांपासून आराम मिळतो, ज्यामुळे पोटातील आवाज देखील कमी होतो. त्याचप्रमाणे अन्न चांगले चावून खावे यामुळे पचनसंस्था चांगली काम करते आणि गॅस किंवा आम्लपित्तची समस्या कमी होत.

## पाककला

### बासमती शृंगार

**साहित्य –** २ वाट्या बासमती तांदूळ, १ वाटी खवा, ३ मोठे चमचे साजूक तूप, ३ वाट्या साखर, अर्धी वाटी काजू-बदाम काप पाव चमचा बेदाणे, १ चमचा वेलदोडा पूड, पाव चमचा केशर (दुधात भिजवून), १ मोठा चमचा गुलाबपाणी (इसेन्स नव्हे) आणि थोड्या गुलाब पाकळ्या.

**कृती –** तांदूळ स्वच्छ धुवून निथळावे. तांदळाच्या दुप्पट पाणी घेऊन ते उकळून त्यात मोकळा सळसळीत भात शिजवावा आणि परातीत पसरून गार होऊ द्यावा. साखरेचा तीनतारी पाक करून त्यात खवा, केशर, वेलदोडा पूड घालावी. जाड बुडाच्या भांड्यात तूप तापवून काजू-बदाम-बेदाणे परतून त्यावर भात घालावा. साखरेचा पाक, गुलाबपाणी घालून सगळे अलगद मिसळावे. मंद आचेवर तवा ठेवून त्यावर भांडे ठेवावे. घट्ट झाकण ठेवून पाक जिरून वाफ येऊ द्यावी. वाढताना भाताच्या मुदी पाडून वर गुलाबपाकळी लावावी.

## वास्तू

ज्या वास्तूची पूर्व दिशा बंदिस्त असते; म्हणजे दारे, खिडक्या, बाल्कनी, अंगण व्हरांडा या ऐवजी भिंत असते, तिथे सूर्यप्रकाश आणि वारा निसर्गतःच येत नाही. अशा बंदिस्त ठिकाणी शौचालय, धान्याचे कोठार किंवा निरुपयोगी सामान, जुने फर्निचर, रद्दी अशी भरताड असते. त्या गृहिणीला वैधव्य, पोटच्या अपत्यांचा अवेळी किंवा तारुण्यात मृत्यू अशा गंभीर यातनांना सामोरे जावे लागते. कधी तर त्यांना पुत्रप्राप्तीही होत नाही. झाल्यास संततींना शारीरिक व्यंगांचा त्रास होतो.

## सौंदर्य

चमचाभर मध, चमचाभर ओटामिल, ३-४ थेंब लिंबाचा रस व चमचाभर दूध एकत्र करून पेस्ट बनवा. ती उघडी रोमछिद्रे असलेल्या त्वचेवर लावा. १५ मिनिटांनी धुवा.

## सल्ला

बेसन फेटताना त्यात चमचाभर खाण्याचा सोडा टाकल्यास बेसन जास्त काळ फेटावे लागत नाही व भजीही फुलतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २९ जुलै २०२५

**नागपंचमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, उत्तरा १९।२८, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : काही विशेष करण्याचा प्रयत्न करा. आपणास प्रेमात अत्यंत सुख मिळेल. संततीसौख्य लाभेल. मागील उधारी वसुल होईल.

**वृषभ** : पळापळ देखील अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. धनाचा व्यय होईल. मागील बाकी व उधारी वसुल होईल. जुन्या मित्रांची भेट होईल.

**मिथुन** : कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या. जुन्या मित्रांची भेट होईल.

**कर्क** : सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. आपणास समाधानकारक स्थिती मिळेल.

**सिंह** : आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील. उधारी उसनवारी मिळेल.

**कन्या** : जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळा. आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल.

**तूळ** : परिस्थिती अनुकूल राहील याची काळजी घ्या. आरोग्य उत्तम राहिल. जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळा.

**वृश्चिक** : चांगले प्रदर्शन करण्यास अडचणी येतील. निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका. मनस्थिती उत्तम राहिल. दैनंदिन कार्ये पूर्ण झाल्याने उत्साह वाढेल.

**धनु** : कौटुंबिक जीवन उत्तम असेल आणि घरातील मंडळी फारच आनंदात राहणार आहे. मागील येणी वसुल होईल. शारिरीक व्याधी बळावतील.


**मकर** : भावनांच्या भरात वाहून नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक विषयांमध्ये स्थिती सहयोगात्मक राहील. कार्यालयीन सहकाऱ्यांकडून मदतीची अपेक्षा नको.

**कुंभ** : सहकाऱ्यांशी होणारे वैचारिक मतभेद टाळा. आपणास नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहिल.

**मीन** : ग्रहदशेत एक महत्त्वपूर्ण बदल झाल्याने स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. भावंडांकडून मदत मिळेल. शेजाऱ्यांशी वाद घालू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२३० सौ.शैलजा कुलकर्णी



**उभे शब्द :-** १) लागलीच; लगोलग; तातडीने ४) सकाळच्या वेळी गवताच्या पात्यावर दिसतात ते बाष्पीभवनापासून तयार झालेले जलबिंदू ६) वाहणाच्या किंवा घोड्याच्या टाचेला मारतात तो लोखंडाचा अर्धचंद्राकृती तुकडा ७) विश्वासघात करणारा ८) या मावळ्यामुळे अफजलखान भेटीच्या वेळी शिवाजी महाराजांचे प्राण वाचले १०) अरण्य; जंगल; रान ११) मनातील विचार; मानसिकता १२) छोटा; सान; लघू १४) गेह; गृह; निवासस्थान १५) अविरत; निरंतर १७) तेल, राळ, मेण आदींचे चिकट मिश्रण १९) नर्मदेचे दुसरे नाव २०) एक समसंख्या २२) एक विषारी साप २३) कणखर; दणकट; राकट

**आडवे शब्द :-** १) कोंडाणा किल्ला सर करताना या मावळ्याचे बलिदान झाले २) दणकट; राकट; मजबूत; शक्तिवान ३) वचपा; सूड ४) दडपण; दाब; वजन ५) पत असलेला; प्रतिष्ठित; जड ९) खलबत; विचारविनिमय १३) माणसांतील श्रेष्ठ १४) मोठा हातोडा १६) ताजा; प्रफुल्लित; टवटवीत १८) ही शोधाची जननी आहे असे म्हणतात २१) निर्जीव शरीर; मुडदा; शव

शब्दगंध क्र. ७२२९ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ध्येय जितके महान असते; तेवढा त्याचा मार्गही लांब व खडतर असतो. – **साने गुरुजी.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आम्लपित्त म्हणजे काय?

आम्लपित्त म्हणजे जठरात प्रमाणापेक्षा जास्त आम्ल तयार होणे. साधारणतः पचनसंस्थेत आम्लाची, अल्कलीची निर्मिती होत असते. आम्लाची निर्मिती झाल्यावर त्याच्या उदासिनीकरणासाठी त्याविरुद्ध अल्कलीचे प्रमाण वाढते. अल्कली निर्माण होण्यास गॅस्ट्रीन हे संप्रेरक कारणीभूत असते. अल्कलीचे प्रमाण वाढले की, व्हॅगस नावाच्या चेतातंतूद्वारे उद्दीपन होऊन आम्लाची निर्मिती होते व अल्कली उदासीन होतात. परंतु, बऱ्याचवेळा उदासिनीकरणानंतरही आम्लाची निर्मिती होत राहते व जादा आम्ल तयार होण्याने तक्रारी सुरू होतात. यालाच आम्लपित्त होणे असे म्हणतात. या जास्तीच्या आम्लामुळे पोटात/छातीत जळजळ, तोंडाला आंबट पाणी येणे व कधी कधी उलटी होणे, अशा तक्रारी सुरू होतात.

आम्लपित्ताच्या तक्रारीचे पुढे अन्नमार्गात होणाऱ्या अल्सरमध्ये म्हणजे व्रणात रूपांतर होऊ शकते. आम्लपित्त या आजाराचे प्रमाण खेड्यांपेक्षा शहरी लोकांत जास्त आहे. कारण की curry-rry-worry-curry या गोष्टी शहरात राहणाऱ्या व्यक्तींच्या दैनंदिनीचा भाग झालेला असतो. Hurry म्हणजे घाई, धावपळ, बस लोकलच्या वेळा सांभाळणे, त्यासाठी घाईघाईने जेवणे, सर्व गोष्टी वेळांमध्ये बसवण्याची कसरत करत राहणे, जेवणाच्या वेळातील अनियमितता. worry म्हणजे व्यवसायानुरूप येणाऱ्या, सामाजिक कारणांमुळे निर्माण होणाऱ्या चिंता; तसेच curry म्हणजे मसालेदार पदार्थ! खूप तिखट, तेलकट आंबट पदार्थ वारंवार खाण्यामुळे; तसेच दारू, सिगारेट यांचे अतिसेवन यामुळे जठरातील आम्लनिर्मिती प्रमाणापेक्षा अधिक होऊन आम्लपित्ताच्या तक्रारी सुरू होतात.

आम्लपित्ताचा त्रास कमी करावयाचा असेल, तर वरील सर्व गोष्टी टाळणे; दिनचर्या नियमित करणे; अनाठायी चिंता, विडी सिगारेट दारू तंबाखू यांचा अतिरेक न करणे; तिखट, मसालेदार पदार्थ कमी खाणे हे उपाय करायला हवेत. आम्लपित्तावर ॲंटासिडच्या गोळ्या वापरतात.

घरगुती उपायांमध्ये सोडा, लिंबू घेऊन हा त्रास कमी करता येतो. जेवणाच्या वेळा नियमित ठेवणे, जागरण टाळणे, आहारात ज्वारीची भाकरी, मुगाचे वरण, हिरव्या पालेभाज्या, ताक यांचा समावेश करणे, व्यसन टाळणे या उपायांनी आम्लपित्तावर नक्कीच मात करता येईल. आयुर्वेदात यासाठी खूप चांगले उपचार उपलब्ध आहेत. अर्थात औषधीपेक्षा जीवनशैलीतील बदल उपचारात महत्त्वाची भूमिका बजावतात, हे विसरता कामा नये. आम्लपित्ताला व त्यामुळे होणाऱ्या व्रणांना हेलिकोबॅक्टर पायलोरी हे जिवाणू जबाबदार असतात. असे संशोधन करणाऱ्या डॉ. मार्शल व डॉ. वॉरेन या ऑस्ट्रेलियन संशोधकांना २००५ च्या वैद्यक शास्त्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यामुळे आता या आजाराच्या उपचारात पुष्कळ बदल होणार आहेत!

### खापर

एका मनुष्यापाशी बराच पैसा होता, पण तेवढ्याने त्याचे समाधान होईना. कित्येक व्यापारी लोकांनी अगदी थोड्या वेळात हजारो रूपये मिळविलेले पाहून, आपणही व्यापारावर पैसा मिळवावा, असे त्यास वाटले. मग त्याने काही भांडवलावर व्यापार केला व त्यात त्यास सुदैवाने पुष्कळ पैसा मिळाला.

'इतक्या अल्प अवकाशात तुम्ही एवढे श्रीमंत कशाने झाला?' असा काही लोकांनी त्यास प्रश्न केला; तेव्हां तो म्हणतो, 'हे सगळे चातुर्याचे आणि उद्योगाचे फळ आहे.' मिळालेल्या पैशांत समाधान मानून तो मनुष्य जर स्वस्थ बसला असता, तर त्यास आपले सगळे आयुष्य मोठ्या सुखाने घालविता आले असते, परंतु दुर्दैवाने आणखी द्रव्य मिळविण्याची इच्छा त्यास उत्पन्न झाली. शेवटी व्यापार करता करता सगळेच पारडे फिरले आणि एके दिवशी तर दुपारच्या जेवणाचीही त्यास भ्रांत पडली! ही त्याची दुःस्थिती ऐकून काही लोक त्याच्या समाचारास आले.

त्यांनी त्यास विचारले, 'अहो, ही इतकी वाईट स्थिती तुम्हांस आली तरी कशी?' तो म्हणाला,

'हे सगळे माझ्या दैवाचे खेळ आहेत; माझ्या दैवाने माझी अशी स्थिती केली.' दैव जवळच होते, त्याने हे शब्द ऐकताच त्यास म्हटले, 'अरे बाबा, तुला जेव्हा पैसा मिळाला होता, तेव्हा जर तुला माझी आठवण झाली नाही, तर आता तुझ्या या दुःस्थितीचे खापर तू माझ्या कपाळावर का फोडतोस?'

तात्पर्य : तोटा झाल्यास त्याचे खापर नेहमी दुसऱ्यावर फोडले जाते.

## जीवन का अमृत (भाग १)



### बसंत ऋतु

इस शब्द में गुरु अर्जनदेव जी महाराज हमें समझा रहे हैं कि हम अपने आपको दुनिया से हटाकर अंतर्मुख करें। खुशियों के ख़ज़ाने हमारे अंतर में हैं। जब हम अंतर्मुख होकर अपना ध्यान शिव-नेत्र पर एकाग्र करते हैं, तो हमारी आत्मा की लम्बी अँधेरी रात समाप्त हो जाती है। जब हम अपना सारा ध्यान परमात्मा की ओर करेंगे, तो हम उसका ही रूप बन जायेंगे और जिस purpose से, जिस ध्येय की प्राप्ति के लिए हम इस दुनिया में आये हैं, वह पूरा हो जाएगा।

हमें होली खेलने के लिए होली के दिन का इंतजार नहीं करना चाहिए। हमें अंतर में अपने प्रियतम के साथ होली खेलनी है। बाहर की होली तो दुनिया के लोग खेलते हैं। जिन्होंने प्रभु को पाना है, उन्हें होली अंतर में अपने सतुरु के साथ खेलनी है और इस होली को खेलने के लिए हमें किसी विशेष दिन का इंतजार नहीं करना है। हम रोज़ होली खेल सकते हैं, पल-पल होली खेल सकते हैं। हमें केवल अंतर्मुख होना है। जब हम अपने प्रियतम से होली खेलेंगे, तो वे खुद-ब-खुद हमें प्रभु के दर्शन करवाँ देंगे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

आक्रोश और इनकार इन खतरों के प्रति जागरूक हो उठे लोगों में से कुछ इस बात को लेकर आक्रोश से भर जाते हैं कि सरकारें तथा दूसरे लोग हालात की असलियत की ओर से अक्सर बेपरवाह रहते हैं, हकीकत को मानने से इनकार करते हैं। तथापि कुछ समय पश्चात उन्हें एहसास हो जाता है कि इस आक्रोश और निराशा का उनके स्वास्थ्य तथा उनकी कारगरता दोनों पर बुरा असर पड़ सकता है। कदाचित् हमारे लिए यह बात उपयोगी सिद्ध होगी कि आक्रोश और इनकार को हम विश्वव्यापी विनाश के इस संदर्भ में शोक-संतप्त होने की प्रक्रिया के स्वाभाविक संकेतों के रूप में देखें, जिनका वर्णन 'पंच-अवस्था' संबंधी उदाहरण में किया गया है।

यहाँ तक कि जो 'सौदेबाजी' चल रही है, इन उम्मीदों के साथ कि इस गड़बड़झाले में से कुछ तो बचाया जा सकता है। हालाँकि विशेष रिपोर्टें बता रही हैं कि पहले ही बहुत देर हो चुकी है, उसे भी पूर्वोक्त संदर्भ में देखा जा सकता। यह कुछ ऐसा है, जैसे हमें लगता हो कि संसार का अब अंत होनेवाला है, किंतु स्थिति को अधिक स्पष्ट करनेवाली जानकारी के अभाव में (जिसमें यह तथ्य भी शामिल है कि अंततः मृत्यु होती नहीं है) हमें संसार छोड़कर जाने का विचार सहन करना असंभव प्रतीत होता है। इस समझ या आशा के बिना क्षति के बारे में विचार करना कठिन है कि उसकी जगह कुछ अधिक अच्छा आ सकता है। तथापि यदि नुकसान अत्यंत निकट है और हम साहसपूर्वक उसका सामना नहीं करते हैं तथा उसके लिए तैयार नहीं होते हैं, तो निश्चित ही हम स्वयं को एक बड़े भारी और कष्टप्रद सदमे में डाल रहे होंगे।

दादी जानकी कहती हैं यही कारण है कि मैंने इतनी लंबी आयु पाई है और जब तक मुझे जीवित रहना है, तब तक मुझे यथासंभव अधिक-से-अधिक लोगों के साथ अपनी इस पक्की धारणा तथा अंतर्दृष्टि को बाँटते रहना है कि जिस प्रकार किसी व्यक्ति की मृत्यु को एक संक्रांति के रूप में समझना चाहिए, वही बात धरती पर जीवन के सम्मुख अंतिम व्यथा-वेदनाओं के बारे में भी सच है। संसार को हमारी चिंता या हमारे शोक की जरूरत नहीं है। हम एक अंतहीन कहानी, एक अखंडित संपूर्ण का हिस्सा हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**आई :** बेटा तु केस का कापत नाही ?

**मुलगा :** फॅशन आहे आई.

**आई :** गाढवा तुझ्या ताईला पाहून गेलेल्या पाहुण्यांचा निरोप आलाय लहान मुलगी पसंत आहे म्हणून. आता जा नांदायला

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ वर्ष २०२२ ची दिलीप ट्रॉफी कोणत्या संघाने जिंकली?

– पश्चिम झोन

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

## मिरची

३) रोजच्या आहारामध्ये लाल मिरचीचा उपयोग करण्यासाठी सुकलेल्या लाल मिरच्यांची कुटून किंवा दळून तिखट पावडर बनवून ठेवावी. तिचा वापर आवश्यकतेनुसार आहारात करावा.

४) हिरव्या मिरच्यांचे लोणचेही चांगले होते. या मिरच्यांच्या लोणच्यामध्ये लिंबाच्या फोडी करून घातल्याने लोणचे स्वादिष्ट तर लागतेच, शिवाय त्यासोबत घेतलेल्या अन्नाचे पचनही व्यवस्थित होते. ५) लाल मिरचीच्या आतील बी काढून ती मिरची गायीच्या तुपात तळावी. नंतर भाताबरोबर ती कुस्करून खाल्लस भातास छान चव येते.

६) झाडांवर कीटकनाशकांची फवारणी करण्याऐवजी मिरच्यांचा रस + कडूलिंबाच्या पानांचा रस (लिंबोळ्याचा रस) + गोमूत्र एकत्र करून जर झाडांवर फवारणी केली, तर झाडांना कीड लागत नाही.

७) अपचन, अग्निमांद्य, भूक कमी लागणे, तोंडास चव नसणे या लक्षणांवर जर योग्य प्रमाणात आहारामध्ये मिरचीचा वापर केला, तर पचनक्रिया सुधारून वरील लक्षणे कमी होतात.

८) दातदुखीचा त्रास वाढला असेल, तर मिरच्यांच्या रसात कापूस भिजवून तो दुखणाच्या दाताखाली धरून ठेवावा. यामुळे दातदुखी थांबते.

९) तोंडास अरुची निर्माण होणे, भूक न लागणे या लक्षणांवर थोड्या प्रमाणात ताजी मिरची खावी.

१०) शेंगादाणे घालून तयार केलेला मिरचीचा ठेचा व बाजरीची भाकरी गरिबांचे आणि ग्रामीण भागातील लोकांचे मुख्य अन्न आहे.

११) कुत्रा चावला असल्यास त्याचे विष कमी करण्यासाठी दवाखान्यात जाण्यापूर्वी प्रथम ोचार म्हणून ती जखम स्वच्छ धुऊन त्यात हळद व किंचित मिरची पावडर भरावी. थोड्या वेळाने लगेच धुऊन टाकावी. यामुळे जखम पिकत नाही व लवकर भरून येते.

१२) निरनिराळ्या प्रकारच्या औषधांमध्ये, चूर्णांमध्ये, लेप, मलमांमध्ये मिरचीचा उपयोग जंतुनाशक म्हणून केला जातो.

१३) संधिवाताचा त्रास होत असेल, तर दुखऱ्या भागावर मिरचीचे मलम लावल्यास वेदना कमी होतात.

१४) ताप आला असेल, तर थोड्या प्रमाणात मिरची खावी. यामुळे रक्त शुद्ध होऊन घाम येतो व ताप त्वरित कमी होतो.

**सावधानता** : मिरचीमुळे जरी भोजन स्वादिष्ट, रुचकर होत असले, तरी तिचा वापर प्रमाणात करावा. कारण जास्त प्रमाणात मिरची खाणे शरीरासाठी नुकसानकारक आहे. यामुळे दाह, लघवी होताना जळजळ होणे, मूळव्याध, शरीराची, त्वचेची, आतड्यांची, पोटाची, आग होणे अशी लक्षणे दिसून येतात. मिरचीच्या जास्त तिखटपणामुळे व अतिरिक्त सेवनाने शरीरात तमोगुण वाढीस लागतो. रक्तातील उष्णता वाढते. डोळ्यांचे नुकसान होते. पुरुषत्व कमी होते. तसेच किडनीला इजा पोहोचू शकते. त्यामुळे मिरचीचा उपयोग आवश्यक तेवढ्याच प्रमाणात करावा. सहसा मिरची पावडर ही घरीच बनवावी. बाजारातून आयती तिखट पावडर आणू नये. कारण त्यामध्ये कचरा व भेसळ असण्याची शक्यता असते. तयार तिखट पावडरमध्ये बिया, देठे, भेसळ, कचरा असण्याची शक्यता असते. म्हणून लाल मिरच्या आणून त्यांची देठे काढून नंतर त्या दळाव्यात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर शहरात संविधान भवन उभारण्यास १५ कोटींचा निधी

नगर – अहिल्यानगर शहरात लवकरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावेला साजेसे असे संविधान भवन उभारले जाईल. यासाठी जिल्हा नियोजन निधीतून ५ कोटी रूपये व शासन १० कोटी रूपये निधी उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी दिली.

मार्केट यार्ड चौक येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महानगरपालिका आयुक्त डॉ.यशवंत डांगे, अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे, डॉ.सुजय विखे पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, भन्ते राहूल बोधी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, देशाला एकता, समता आणि बंधुतेच्या नात्याने बांधण्याची ताकद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये आहे. आज येथे उभारण्यात आलेला बाबासाहेबांचा पुतळा म्हणजे त्यांच्या कार्याचा व विचारांचा खऱ्या अर्थाने गौरव आहे. शिक्षण, समता व बंधुता ही बाबासाहेबांची त्रिसूत्री आपल्या मनात कायम जागी ठेवणारे हे स्मारक नियमितपणे प्रेरणा देणारे ठरेल.

जगातील सर्वोत्कृष्ट संविधान डॉ. आंबेडकरांनी भारताला दिले. त्यांनी गरीब, वंचित व शोषित घटकांना समानतेचा हक्क बहाल केला. यावर्षी सामाजिक न्याय विभागासाठी २५ हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. जोपर्यंत या पृथ्वीवर चंद्रसूर्य अस्तित्वात आहेत, तोपर्यंत भारताचे संविधान कधीही बदलेले जाणार नाही.

बाबासाहेबांच्या समता व न्याय या तत्त्वांवर आधारलेले संविधान भारताला एकसंघ ठेवण्याचे कार्य करत आहे. प्रत्येक नागरिकाला विकासाची समान संधी संविधानामुळेच प्राप्त झाली आहे. भारतीय सामाजिक चळवळीला बळ देणारे नेतृत्व डॉ. आंबेडकर यांनी दिले.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही; भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे मार्केट यार्ड येथे अनावरण**



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे मार्केट यार्ड येथे अनावरण करण्यात आले.

त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याकडे पाहताना त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे स्मरण सतत होत राहील.

इंदू मिल येथील भव्य स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. महापुरुषांच्या विचारांवर आधारित राज्यकारभाराची वाटचाल सुरू असून, नव्या पिढीने बाबासाहेबांचे विचार अंगीकारून आपल्या जीवनात सामाजिक समतेची दिशा निश्चितच स्वीकारावी, अशी अपेक्षाही उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित समाजासाठी आपले जीवन समर्पित केले होते. अहिल्यानगर जिल्ह्यात १९२८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली होती. अहिल्यानगर येथील निवासात असतांनाच त्यांनी 'थॉट्स ऑफ पाकिस्तान' हा ग्रंथ लिहिला. लंडन गोलमेज परिषदेतून आल्यानंतर जिल्ह्याच्या वतीने त्यांचा मुंबई येथे सत्कार करण्यात आला. बाबासाहेबांचे अहिल्यानगर जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे नाते होते.

आमदार जगताप म्हणाले, मार्केट यार्ड येथे साकार होत असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधानाला कधीही धक्का लागणार नाही ते चिरकाल टिकणारे आहे. अहिल्यानगर येथे संविधान भवन उभे राहावे, अशी अपेक्षाही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे व्यक्त केली.

कार्यक्रमापूर्वी, गायक आनंद शिंदे यांच्या संगीत पथकाने आंबेडकरी गीतांचा कार्यक्रम सादर केला.

याप्रसंगी प्रा.जोगेंद्र कवाडे, पुतळा समितीचे अध्यक्ष सुमेध गायकवाड, अशोक गायकवाड, अजय साळवे, नाथाभाऊ आल्हाट, सुरेश बनसोडे, महानगरपालिका जल अभियंता परिमल निकम, भन्ते राहूल बोधी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविकात आयुक्त यशवंत डांगे यांनी अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या विकासकामांचे सादरीकरण केले.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची वैशिष्ट्ये

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व स्मारक हे नवी दिल्ली येथील नव्या संसद भवन अर्थात सेंट्रल व्हिस्टा या वास्तूच्या प्रेरणेने साकारण्यात आले आहे. या स्मारकात १५ फूट उंचीचा चौथारा असून त्यावर १० फूट उंचीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कास्य धातूपासून साकारलेला पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे एकूण वजन ९५० किलोग्रॅम आहे. या पुतळ्याच्या मागील भिंतीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी एलईडी स्वरूपात उभारण्यात आली आहे, तसेच साक्षरतेचे प्रतीक म्हणून लेखणीचे शिल्प पुतळ्याच्या समोरच्या बाजूस स्थापन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या धर्तीवर हा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याच्या निर्मितीसाठी रूपये १६ लाख ७९ हजार इतका खर्च आला आहे. या पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी ६६ लाख रूपये खर्च करण्यात आला आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श स्मारकाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या मिळेल : उपमुख्यमंत्री अजित पवार

नगर – आजच्या प्रगत महाराष्ट्रात विकसित देशाचा पाया क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी रचला. समाजसुधारणा, महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्याकार्याचा आदर्श या पूर्णाकृती स्मारकाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या आपण सर्वांना मिळत राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

माळीवाडा वेस येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या चौथऱ्याचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.



माळीवाडा येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करून क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या चौथऱ्याचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, डॉ.सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अभय आगरकर, सचिन जगताप, अक्षय कर्डीले, माणिकराव विधाते, नितेश भिंगारदिवे, माजी आयुक्त पंकज जावळे आदी उपस्थित होते.

ना. अजित पवार म्हणाले, देशाला व राज्याला अनेक महापुरुष व महान स्त्रियांनी योग्य मार्ग दाखवला. त्यांच्याच विचारांचा आदर्श घेत समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन राज्य शासन काम करत आहे. आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. स्वातंत्र्याचा, स्वाभिमानाचा अनुभव घेत त्या आपले योगदान देत असल्याचेही ते म्हणाले.

राज्यातील महापुरुष व महान स्त्रियांची स्मारके उभारण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येत आहे. यासाठी पावणेसातशे कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव याजन्मगावी १०० कोटी रुपये खर्च करून प्रत्येकाला अभिमान वाटेल असे स्मारक उभे केले जात आहे. जिल्ह्यातील महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे टप्याटप्याने पूर्णाकृती स्वरूपात उभारण्यात येतील, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिली.

### असे आहे स्मारक

अहिल्यानगर महापालिका हद्दीत क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा व स्मारक उभारण्यात आले आहे.हे स्मारक स्त्री शिक्षणाचे प्रतीक म्हणून साकारण्यात आले असून, यामध्ये महात्मा फुले यांचा १० फूट उंचीचा आणि सावित्रीबाई फुले यांचा ९ फूट उंचीचा कास्य धातूपासून बनवलेला पुतळा आहे. त्याचबरोबर शाळेत जात असलेल्या ४ फूट उंचीच्या एका लहान मुलीची मूर्तीही समोर स्थापित करण्यात आली आहे. या तिन्ही शिल्पांचे एकूण वजन सुमारे १८०० किलोग्रॅम आहे. स्मारकाच्या परिसरात भिडे वाड्यातील प्रेरणादायी पाच भित्तीचित्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये स्त्री शिक्षण, हुंडा प्रथेविरोध, सती प्रथा, सामाजिक विषमता आणि फुले वाड्यातील जीवनदृष्यांचा समावेश आहे. पुतळा निर्मितीसाठी ५० लाख ६० हजार रुपये इतका खर्च आला आहे. सुशोभीकरणासाठी ४१ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

## लाड सुवर्णकार सोसायटीकडून दहावी, बारावीच्या गुणवंतांचा करण्यात येणार सन्मान

नगर – लाड सुवर्णकार समाजातील दहावी व बारावीत शिक्षणाबरोबरच विविध परीक्षेत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा लाड सुवर्णकार सेन्ट्रल को – ऑप. क्रेडिट सोसायटीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती सोसायटीचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी दिली.

संस्थेच्या सभासदांना व सुवर्णकार समाजातील ज्यांचे पाल्य इयत्ता दहावी, बारावी परीक्षा सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये सत्तर टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत तसेच इतर पदवी परीक्षा कोणत्याही क्षेत्रात विशेष उल्लेखनीय संपादन केले आहे अशा पाल्यांचा साक्षांकित प्रति व पासपोर्ट साईज फोटो व मोबाईल नंबर १० ऑगस्ट पर्यंत सोसायटीकडे सकाळी ११ ते ५ या वेळेत आणून द्याव्यात. आपल्या पाल्याचा संस्थेच्या वतीने गुणगौरव करण्यात येणार आहे, असे आवाहन प्रकाश लोळगे, सुभाष कायगावकर, प्रमोद बुऱ्हाडे, सोमनाथ मैड यांनी केले आहे. संपर्क ०२४१२३५५०८८

## राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी ३० जुलैला अहमदनगर जिल्ह्याच्या संघ निवडीसाठी चाचणी

नगर – महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना यांच्यावतीने ९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या १८ वर्षांखालील मुला–मुलींच्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धा बालेवाडी, पुणे येथे होणार असून स्पर्धेकरीता अहमदनगर जिल्ह्याचा संघ पाठवायचा आहे. यासाठी अहमदनगर जिल्ह्याचा संघ निवडण्याकरीता ३० जुलै रोजी संघ निवडचाचणी अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या वतीने आयोजित केली आहे. सदर निवड चाचणी ही सावेडी येथील जॉगिंग ट्रॅक, बास्केटबॉल मैदान येथे दुपारी ३ वाजता आयोजित केली आहे. सदर निवड चाचणीकरीता येताना खेळाडूंनी आधार कार्ड झेरॉक्स, जन्मदाखला झेरॉक्स, २ पासपोर्ट साईज फोटो आणावेत. निवड चाचणीसाठी सत्येन देवळालीकर, मो. ९२२६३१२५५६ व सचिन भापकर, मो. ९०२८९९०३९७ यांचेशी संपर्क करावा.

निवड चाचणीसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव कैलास शानबाग व सहसचिव संजय ढोणे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी सैनिकांबद्दल आदरभाव ठेवला पाहिजे : फरीद बापु

नगर – सिमेवरील जवान देशाच्या संरक्षणासाठी आपली जीवाची बाजी लावत आहेत. अनेक युद्धात आपल्या सैनिकांनी शत्रूंना पराजयाची धूळ चारली आहे. त्यापैकीच कारगील युद्ध एक होय. या युद्धात शहिद झालेल्या जवानांप्रती आदरभाव प्रत्येकाने व्यक्त केला पाहिजे. हीच जाणिव ठेवून मखदुम सोसायटीच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करुन सैनिकांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अशा उपक्रमातूनच आपण देशाचे एक जागरुक नागरिक म्हणून पुढे यावे, असे आवाहन मालिश तज्ञ फरीद बापु यांनी केले.

मखदुम सोसायटी व रेहमत सुलतान फौंडेशनच्यावतीने तपोवन रोड येथील अनाथ व निराधार बालकांचे बालघर प्रकल्प मधील विद्यार्थ्यांना वह्या वितरण करण्यात आले. याप्रसंगी मसाजिस्ट फरीद बापु, मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, सचिव डॉ.कमर सुरुर, बालघर प्रकल्पचे युवराज गुंड आदि उपस्थित होते. या उपक्रमासाठी वसंत पारधे, शफी हज उमरा टुर्स, राजकुमार गुरनानी, युनुसभाई तांबटकर, तन्नु महाराज, आर्किटेक्ट अर्शद शेख, शरफुद्दीन सर, सारीका रघुवंशी, राजुभाई शेख आदिंचे सहकार्य लाभले.

पुढे बोलतांना फरीद बापु म्हणाले की, समाजात काम करणाऱ्या संस्थांनी फक्त शालेय मदत न करता या विद्यार्थ्यांसाठी इतर शैक्षणिक कार्यक्रमही आयोजित करण्याची गरज असल्याचे सांगितले.

सूत्रसचांलन आबीद खान यांनी केले. प्रास्तविक डॉ. कमर सुरुर यांनी केले. युवराज गुंड यांनी आभार मानले.

**कारगिल विजय दिवसानिमित्त मख़दुम सोसायटीतर्फे बालघर प्रकल्पमधील विद्यार्थ्यांनी वह्या वितरण**



मखदुम सोसायटी व रेहमत सुलतान फौंडेशनच्यावतीने तपोवन रोड येथील अनाथ व निराधार बालकांचे बालघर प्रकल्प मधील विद्यार्थ्यांना वह्या वितरण करण्यात आले.



अहिल्यानगर येथे महिला संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. देशमुख यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना कौशल्य विकास, उद्योजकता व रोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले.

# कौशल्य विकासाच्या माध्यमातून महिलांनी प्रगती साधावी : विनायकराव देशमुख

नगर – कौशल्य विकास कार्यक्रमावर विशेष भर देण्यात आला असून या माध्यमातून महिलांनी स्वतःची प्रगती साधावी, असे प्रतिपादन कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख यांनी केले.

महिला संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. देशमुख यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना कौशल्य विकास, उद्योजकता व रोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले.

आय.एस.डी.टी. सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस संस्थेच्या संचालिका पूजा भगत–देशमुख, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव गीता गिल्डा, भाजपा महिला मोर्चा अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे, सरचिटणीस सविता कोटा, सावेडी मंडल अध्यक्षा रेणुका करंदीकर, कालिंदी केसकर, छाया रजपूत, रेखा मैड, सुरेखा जंगम, श्वेता पंधाडे–झोंड, उमा बडगु, रजनी भंडारी यांच्यासह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, युवक, महिला यांच्यासाठी रोजगार निर्मिती व्हावी, या उद्देशाने केंद्र आणि राज्य सरकारने अनेक योजना हाती घेतल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचा समावेश आहे. राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागासाठी ५७०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी या विभागाच्या योजनांचा उपयोग करून आपली प्रगती साधावी. या योजनांबाबत जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आजची बैठक आयोजित करण्यात आल्याचे श्री. देशमुख यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्ह्यात जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. ही संख्या एक लाखापेक्षा जास्त असून त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात जिल्ह्यातील महिला संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले.

या बैठकीमुळे महिला संस्थांना प्रथमच कामाची दिशा मिळाली असून आगामी काळात या कामाला गती मिळेल असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक महिला मोर्चा शहर जिल्हाध्यक्षा श्रीमती प्रिया जानवे यांनी केले. भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव श्रीमती गीता गिल्डा यांनी संस्थांच्या वतीने विनायकराव देशमुख व पूजा देशमुख यांचा सत्कार केला.

# आचार्य आनंदऋषीजी यांच्या आशीर्वादाने हजारो रुग्ण वेदना मुक्त

**उद्योजक पेमराज बोथरा यांचे प्रतिपादन; रुग्णसेवेच्या उल्लेखनीय कार्याबद्दल उद्योजक सतीश व सौ.मंगला रूणवाल यांचा विशेष सत्कार**

नगर – संत विचारांवर नितांत श्रध्दा असलेल्या रुणवाल परिवाराने राष्ट्रसंत आनदंऋषीजी हॉस्पिटलमध्ये सूक्ष्म व्यायामव्दारे मणके विकारांपासून मुक्ती या विभागाची सुरुवात १ जुलै २०१७ रोजी केली. तसेच विभागाचे नूतनीकरण ही उद्योजक सतीश रुणवाल व मंगला रुणवाल यांनी करून दिले. सलग आठ वर्षांपासून व्याधीमुक्त रूग्ण हा संकल्प घेवून या विभागाच्या संचालनात रुणवाल परिवार योगदान देत आहेत. रुणवाल परीवाराच्या या योगदानामुळे आज हजारो रूग्ण वर्षानुवर्षे ज्या व्याधीचा सामना करायचे ते व्याधीमुक्त होवून आनंदी आयुष्य जगत आहेत. या विभागाद्वारे विनाशुल्क फक्त सूक्ष्म व्यायामाव्दारे विना औषध रूग्ण बरे होत आहेत. गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी यांच्या आशीर्वादाने हजारो रुग्ण वेदना मुक्त होत आहे, असे प्रतिपादन उद्योजक पेमराज बोथरा यांनी केले आहे.



आनंदऋषीजी ब्लड बँक येथे सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे मणके विकारापासून मुक्ती या विभागातील रुग्णसेवेच्या उल्लेखनीय कार्य व योगदानाबद्दल उद्योजक सतीश रुणवाल व मंगला रुणवाल यांचा व्याधीमुक्त झालेल्या रुग्णांच्या वतीने सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

आनंदऋषीजी ब्लड बँक येथे सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे मणके विकारापासून मुक्ती या विभागातील रुग्णसेवेच्या उल्लेखनीय कार्य व योगदानाबद्दल उद्योजक सतीश रुणवाल व मंगला रुणवाल यांचा व्याधीमुक्त झालेल्या रुग्णांच्या वतीने सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक पेमराज बोथरा, संतोष बोथरा, सीएआयपी अजय मुथा, व्यायाम व मेडिटेशन तज्ञ प्रसाद जोशी, डॉ.अमोल खांदवे, बालेश दंडवते, चिरंजीव निखिलेश पाठक, महेंद्र कांकरिया, संगीता बोथरा, मनीषा बोथरा, सायली जोशी, प्रज्ञा दंडवते आदी उपस्थित होते.

संतोष बोथरा म्हणाले, श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रूणवाल या अत्यंत धार्मिक व सात्विक स्वभावाच्या होत्या. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ व रुणवाल परिवाराच्या सहकार्याने सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे मनके विकारापासून मुक्ती या दालनाचे नूतनीकरण झाले आहे. आचार्य आनंदऋषीजी यांच्या नावाने सुरू केलेल्या विभाग अल्पावधीतच नावारूपाला आले आहे. या केंद्रामुळे सूक्ष्म व्यायाम पध्दतीचा मोठा प्रचार व प्रसारही झाला. ठणठणीत बरे झालेल्या रूग्णांचे अनुभव इतरांनाही उपयोगी पडत आहेत. या कार्यातून रुणवाल परिवाराची समाजाप्रती असलेली बांधिलकी, आपुलकी दिसून येते.समाजात रुणवाल परिवारा सारख्या दानशूरांमुळेच दुःखी, कष्टी व्यक्तींना मायेचा आधार मिळत असतो. त्यांना जगण्याची नवी उमेद मिळते.या केंद्राचे माध्यमातून भविष्यातही जास्तीत जास्त रूग्णांना व्याधीमुक्त करण्याचा प्रयत्न अविरतपणे करीत राहिल.

मंगला रुणवाल म्हणाले, आयुष्यात समाजासाठी काम करताना जास्तीत जास्त गरजूंना लाभ होईल हे पाहिले पाहिजे. अशी शिकवण गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी यांनी दिली आहे. या दालनाला स्वर्गीय श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रुणवाल (विजापूर पुणा) यांचे नाव देण्यात आले आहे. याचा आम्हाला अभिमान वाटतो. या आमच्या सासू अत्यंत धार्मिक व सरळ स्वभावाच्या होत्या. त्यामुळेच रुग्णसेवेचे पुण्या चे काम रुणवाल परिवाराच्या हातून होत आहे. जैन सोशल फेडरेशनने मानवसेवेच्या कार्यात रुणवाल परिवाराला सहभागी करून घेतले आहे. सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे अनेकांच्या व्याधी दूर होत आहेत.

प्रास्ताविकात प्रसाद जोशी म्हणाले, सध्या मणके विकारांनी त्रस्त रुग्णांची संख्या खूप वाढली आहे. मणके विकाराचे निदान झाल्यानंतर कशाप्रकारे व्यायामाची निवड करावी. याविषयी शास्त्रोक्त मार्गदर्शन करण्यासाठी आनंदऋषीजी ब्लड बँक येथे सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे मनके विकारापासून मुक्ती हा विभाग गेल्या आठ वर्षापासून प्रभावीपणे कार्यरत आहे. अनेक जिल्ह्यांमधून ३००० हून अधिक रुग्णांनी या उपचार पद्धतीचा लाभ घेतला आहे. या विभागासाठी रुणवाल परिवाराचे मोठे योगदान लाभत आहे.

यावेळी कार्यक्रमात सुषमा पोळ, शर्मिला गुगळे, सुहास कुलकर्णी, सचिन केदार, नाथा देवतरसे, समृद्धी कुलकर्णी, बाफना, दिलीप कुलकर्णी, बळवंत ठुबे, सुदर्शना गुंदेचा, प्रा.ऋचा तांदूळवाडकर आदींनी उपचार घेतल्यानंतर व्याधींपासून मुक्ती मिळाल्याचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सायली जोशी यांनी केले. प्रज्ञा दंडवते यांनी आभार मानले.

# अर्थजगत

गुंतवणुकीच्या बाजारात विषयाधारित (थीमॅटिक) फंड हे एक वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान राखून आहेत. त्यातही मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणारे एमएनसी फंड हे गेल्या काही काळात चर्चेचा विषय ठरले आहेत. एकीकडे अल्पकालीन कामगिरीच्या आघाडीवर हे फंड मागे पडताना दिसतात, तर दुसरीकडे दीर्घकालीन दृष्टिकोनातून यांची शिस्तबद्ध रचना आणि मूल्याधारित निवड गुंतवणूकदारांचे लक्ष वेधून घेत आहे.

## एमएनसी फंड : दीर्घकालीन संपत्तीनिर्मितीसाठी शिस्तबद्ध पर्याय



■ जाणून घ्या

जोखीम पत्करण्याची तयारी असलेल्या गुंतवणूकदारांसाठी एमएनसी फंड हा उत्तम पर्याय आहे. एमएनसी फंड हे ५० टक्क्यांपेक्षा अधिक विदेशी प्रवर्तकांची हिस्सेदारी असलेल्या कंपन्यांत गुंतवणूक करतात. या फंडांचे पोर्टफोलिओ पारंपरिक क्षेत्रांप्रमाणेच असले तरी कंपन्यांच्या व्यवस्थापन व गुणवत्ता निकषांवर ते अधिक लक्ष केंद्रित करतात.

एमएनसी कंपन्यांची रचना प्रामुख्याने प्रभावी रोख प्रवाह, उच्च नफाक्षमतेची धोरणं, कार्यक्षम भांडवली रचना आणि जागतिक दर्जाच्या संचालन प्रक्रियांनी प्रभावित असते. या कंपन्यांची धोरणे अल्प मुदतीतील वेगवेगळ्या बाजार टप्प्यांपासून फारशी प्रभावित होत नाहीत. त्या सतत शाश्वत नफा व भांडवली परतावा देण्यास सक्षम असतात. परिणामी, या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणारे फंड हे तुलनेने अधिक स्थिर असतात.

गुंतवणूकदारांनी या फंडांकडे पाहताना अल्पकालीन चढ-उताराच्या पलीकडे पाहणे आवश्यक आहे. अनेक वेळा बँकिंग किंवा तंत्रज्ञान क्षेत्रात वेगाने होणाऱ्या घडामोडींच्या तुलनेत एमएनसी कंपन्यांचे शेअर कमी प्रतिसाद देतात. पण या शांततेच्या आड दीर्घकालीन संपत्ती निर्माण करणारी गुणवत्ता लपलेली असते. बाजाराचा वेग सुसाट असतानाही या कंपन्यांचा नफा सातत्याने वाढत असतो. परिणामी, वेळोवेळी बाजार थांबल्यावर किंवा उलथापालथीत हे शेअर्स स्थिरतेचा आधार ठरतात.

विविध क्षेत्रांतील व्यापक पोर्टफोलिओ

एमएनसी फंड हे जरी एका विशिष्ट संकल्पनेवर आधारित असले तरी ते क्षेत्रांच्या बाबतीत अत्यंत बहुरंगी असतात. या फंडांमध्ये एफएमसीजी, ऑटोमोबाईल्स, हेल्थकेअर, औद्योगिक उत्पादने, माहिती तंत्रज्ञान, रसायने आणि भांडवली वस्तू अशा अनेक क्षेत्रांतील कंपन्यांचा समावेश असतो. एकाच प्रकारच्या जोखमींना सामोरे जाण्यापेक्षा विविध क्षेत्रांत गुंतवणूक केल्यामुळे या फंडांचा एकंदर जोखीम स्तर नियंत्रित राखला जातो.

**मार्केट-कॅप अ‍ॅग्नोस्टिक दृष्टिकोन**

या फंडांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मार्केट-कॅप अ‍ॅग्नोस्टिक रचना. म्हणजेच हे फंड लार्जकॅप, मिडकॅप आणि स्मॉलकॅप कंपन्यांमध्ये यथोचित प्रमाणात गुंतवणूक करतात. केवळ मोठ्या कंपन्यांवर भर न देता, गुणवत्ता आणि दीर्घकालीन वाढीची क्षमता असलेल्या कंपन्यांची निवड केली जाते.

भारत सरकारच्या औद्योगिक वाढीस प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजनांमुळे एमएनसी कंपन्यांसाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. 'मेक इन इंडिया', पीएलआय (उत्पादन आधारित प्रोत्साहन योजना), आणि निर्यातवाढीवर लक्ष केंद्रीत धोरणांमुळे उत्पादन, संशोधन व विकास यामध्ये जागतिक कंपन्यांचा सहभाग वाढतो आहे. परिणामी, एमएनसी कंपन्या केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारातही आपले अस्तित्व बळकट करत आहेत.

या कंपन्यांचे शेअर अनेकदा तुलनेत अधिक किमतीत व्यवहारात असतात. किंबहुना, त्यांचे पीई गुणोत्तर व ईबिटा या आर्थिक निर्देशांकांवर ते महाग वाटतात. पण ही किंमत त्यांच्या मजबूत बॅलन्स शीट, उच्च लाभांश धोरण, कार्यक्षम व्यवस्थापन व सातत्यपूर्ण रोख प्रवाह यांना लक्षात घेतल्यास उचित ठरते. दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून हे महाग वाटणारे शेअर्स वास्तवात मूल्यवर्धक ठरू शकतात.

**गुंतवणुकीतील भूमिका आणि धोरण**

एमएनसी फंड हे मूलभूत पोर्टफोलिओसाठी नव्हे तर पूरक गुंतवणुकीसाठी उपयुक्त ठरतात. हे फंड बाजारातील विशिष्ट स्थितीत मागे राहू शकतात, पण उताराच्या टप्प्यावर सुसंगतता राखतात. त्यामुळे, गुंतवणूकदारांनी पोर्टफोलिओतील १० ते २० भाग यासाठी राखून ठेवावा. किमान पाच वर्षांचा कालावधी धरून गुंतवणूक करणे अधिक फलदायी ठरते. ◆◆◆



## रेल्वे तिकिट बुकिंगचे नियमबदल

रेल्वे मंत्रालयाने आपत्कालीन कोट्याचे अर्ज सादर करण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. मंत्रालयाने जारी केलेल्या या परिपत्रकानुसार, आपत्कालीन कोटा जागांसाठी अर्ज करणाऱ्या प्रवाशांना आता त्यांच्या प्रवास तारखेच्या एक दिवस आधी अर्ज सादर करावे लागतील. देशभरातील रेल्वे सेवांवर हा नवीन नियम लागू करण्यात आला आहे.

**आपत्कालीन कोटा म्हणजे काय?**

आपत्कालीन परिस्थितीत प्रवास करणाऱ्या काही लोकांसाठी रेल्वेकडून आपत्कालीन कोटा राखीव ठेवला जातो. पूर्वी, आपत्कालीन कोट्याच्या बुकिंगसाठी अर्ज फक्त प्रवासाच्या दिवशीच करता येत होते, परंतु आता नियमांमध्ये बदल झाल्यामुळे ते एक दिवस आधी बुक करावे लागेल.

**कोणाला फायदा होईल?**

जागांचे वाटप करताना, वरिष्ठ सरकारी अधिकारी किंवा खासदार इत्यादींच्या स्व-प्रवासासाठी आपत्कालीन कोटा प्रथम त्यांच्या आंतरज्येष्ठतेनुसार पसंतीच्या क्रमाने वाटप केला जातो. यानंतर, ज्येष्ठ नागरिक, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती, नोकरीच्या मुलाखती आणि इतर कारणांचा विचार केला जातो.


### आपत्कालीन कोट्याचा नवीन नियम

- ✔ परिपत्रकात म्हटले आहे की, रात्री १२:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत धावणाऱ्या सर्व गाड्यांसाठी आपत्कालीन कोट्याचे अर्ज प्रवासाच्या एक दिवस आधी दुपारी १:०० वाजेपर्यंत सादर करावेत.
- ✔ दुपारी १:०१ ते रात्री ११:५९ दरम्यान धावणाऱ्या इतर सर्व गाड्यांसाठी, आपत्कालीन कोट्यासाठी अर्ज प्रवासाच्या आदल्या दिवशी दुपारी १:०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.
- ✔ रविवार किंवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी धावणाऱ्या गाड्यांसाठी, आपत्कालीन कोट्यासाठी अर्ज फक्त कामकाजाच्या दिवशीच सादर करावा लागेल.

**अन्य काही नियमबदल**

- ✔ भारतीय रेल्वेने ट्रेन सुटण्याच्या ८ तास आधी चार्ट तयार करण्याचा नियम लागू केला आहे. आतापर्यंत हा चार्ट फक्त ४ तास आधी बनवला जात होता. यामुळे प्रवाशांना तिकिट कन्फर्म न झाल्यास पर्यायी तिकिट बुक करण्याची संधी मिळेल.
- ✔ तत्काळ तिकिटांसाठी आधार अनिवार्य करण्यात आले आहे. आधार पडताळणीशिवाय वापरकर्ते तत्काळ तिकिटे बुक करू शकणार नाहीत. याशिवाय, १५ जुलैपासून ऑनलाइन इन्स्टंट बुकिंगसाठी आधार क्रमांकाशी जोडलेला ओटीपी देखील अनिवार्य आहे.
- ✔ जर तुमच्याकडे वेटिंग तिकिट असेल तर तुम्हाला स्लीपर आणि एसी कोचमध्ये प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही. याचा अर्थ प्रवास करणे अधिक सोयीस्कर होईल.

## बोनस शेअर्स आणि राईट्स इश्यूवर करआकारणी कशी होते?




■ टॅक्स झोन

भारतीय शेअर बाजारमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढत आहे, आणि त्यासोबतच विविध प्रकारच्या शेअर व्यवहारांबाबतची करपद्धती समजून घेणे अधिक गरजेचे बनले आहे. त्यातील दोन महत्त्वाचे प्रकार म्हणजे बोनस शेअर्स आणि राईट्स इश्यू. कंपन्या वेळोवेळी आपल्या भागधारकांना बोनस शेअर्स किंवा राईट्सच्या माध्यमातून आर्थिक लाभ देतात. मात्र यामागे काही विशिष्ट कर नियम असतात आणि बहुतेकदा गुंतवणूकदार ते नीटपणाने समजून घेत नाहीत. पण या दुर्लक्षाचा परिणाम कराचा भुर्दंड बसण्यात होऊ शकतो. बोनस शेअर्स म्हणजे कंपनी आपल्या नफ्यातून विद्यमान भागधारकांना त्यांच्या आधीच्या शेअर्सच्या प्रमाणात मोफत अतिरिक्त शेअर्स देते. उदा. २:१ चा बोनस म्हणजे प्रति २ शेअर्समागे १ बोनस शेअर मोफत मिळेल. हा बोनस मिळाल्याच्या वेळी काहीही कर लागणार नाही. म्हणजेच, कोणतीही तात्काळ करदेयता निर्माण होत नाही. ही बाब अनेक गुंतवणूकदारांना दिलासा देणारी असते.

पण खरी करधोरणाची सुरुवात होते बोनस शेअर्स विकल्यावर. कारण ते विक्रि करताना भांडवली नफा मोजला जातो आणि तो नफा करपात्र. जर हे शेअर्स १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ ठेवले असतील (सूचिबद्ध शेअर्ससाठी), तर लाँग टर्म कॅपिटल गेन म्हणून १ लाखाच्या पुढचा नफा १० टक्के दराने करपात्र होतो. जर १२ महिन्यांआधी विक्री केली, तर तो शॉर्ट टर्म कॅपिटल गेन मानून १५% कर लागू होतो. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बोनस शेअर्सची खरेदी किंमत 'शून्य' मानली जाते. त्यामुळे विक्रि केलेली रक्कम म्हणजेच संपूर्ण नफा!


आता राईटस् इश्यूचे गणित पाहूया. राईटस् इश्यू हा कंपन्यांकडून भांडवल उभारण्यासाठी वापरला जाणारा मार्ग आहे. यामध्ये विद्यमान भागधारकांना ठराविक सवलतीच्या दराने अतिरिक्त शेअर्स खरेदी करण्याचा अधिकार दिला जातो. हे शेअर्स विकत घेतल्यास तुमचा खरेदी खर्च म्हणजेच कॉस्ट ऑफ अ‍ॅक्विझिशन ठराविक प्रमाणात म्हणजे ४० रुपये प्रतिशेअर असे असते. जेव्हा तुम्ही त्यांची विक्री करता तेव्हा त्या विक्री किमतीतून हे ४० रुपये वजा करून भांडवली नफा मोजला जातो.

जर तुम्ही राईट्स विकत घेतले नाहीत आणि त्याऐवजी बाजारात 'राईट्स एंटायटलमेंट' विकले, तरीही ते व्यवहार कॅपिटल अ‍ॅसेट ट्रान्सफर मानले जातात आणि त्यावरही कॅपिटल गेन लागतो. होल्डिंग कालावधीच्या दृष्टीनेही या नियमांची अंमलबजावणी होते.

**आता प्रश्न उरतो तो म्हणजे हा कॅपिटल गेन आयटीआरमध्ये कसा दाखवावा?**

बोनस आणि राईट्स इश्यू दोन्हीच्या विक्री व्यवहारांची आयटीआरमध्ये नोंद कॅपिटल गेन विभागात केली पाहिजे. हे करताना विक्री किंमत, खरेदी किंमत, विक्रीची तारीख, होल्डिंग कालावधी आणि एलटीसीजी अथवा एसटीसीजी वर्गीकरण याबाबतची माहिती नमूद करणे गरजेचे आहे. थोडक्यात, बोनस शेअर्स आणि राईट्स इश्यू हे जरी फायदेशीर वाटत असले तरी त्यामागील करपद्धती गुंतवणूकदारांनी समजून घेऊन मगच लाभाचे गणित मांडले पाहिजे. ◆◆◆

## चौथा सप्ताह घसरणीचा...



■ इकॉनॉमी

भारतीय शेअर बाजारातील प्रमुख निर्देशांक निफ्टी-५० आणि बीएसई सेन्सेक्स यंदाच्या वर्षातील सर्वात दीर्घ साप्ताहिक घसरणीचा सामना करत शुक्रवारी एका महिन्याच्या नीचांकी पातळीवर बंद झाले. कमकुवत तिमाही निकाल, परदेशी संस्थागत गुंतवणूकदार यांच्या सततच्या विक्रीमुळे आणि जागतिक व्यापारातील अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे. यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणावर विक्रीचा दबाव दिसून आला. या आठवड्यात (२१ ते २५ जुलै) निफ्टी-५० मध्ये ०.५% आणि बीएसई सेन्सेक्समध्ये ०.४% घसरण नोंदवली गेली. शुक्रवारी निफ्टी ०.९९% घसरणीसह २४,८३७ अंकांवर, तर सेन्सेक्स ०.९९% घसरणीसह ८१,४६३.०९ अंकांवर बंद झाले. गेल्या चार आठवड्यांपासून बाजार सातत्याने साप्ताहिक घसरण अनुभवत आहे.

या आठवड्यात १६ पैकी ११ प्रमुख सेक्टरमध्ये घसरण झाली. यामध्ये माहिती तंत्रज्ञान (आयटी), तेल आणि वायू, आणि ग्राहक वस्तू सेक्टर सर्वाधिक प्रभावित झाले. आयटी निर्देशांक ४.१% घसरला, कारण इन्फोसिससारख्या प्रमुख कंपन्यांनी निराशाजनक तिमाही निकाल जाहीर केले. इन्फोसिसच्या समभागात ४.४% घसरण झाली. त्याचप्रमाणे, क्षेत्रात नेस्ले इंडिया आणि कोलगेट पामोलिव्ह इंडियाच्या कमकुवत निकालांमुळे ३.४% घसरण नोंदवली गेली. तेल आणि वायू क्षेत्रात ३.५% घसरण झाली, तर रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभागात रिटेल आणि तेल-रासायनिक व्यवसायातील मंदीच्या चिंतेमुळे ५.७% घट झाली.

**गुंतवणूकदारांचे ७.७७ लाख कोटींचे नुकसान :** या आठवड्यात बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४५,९४५,८६४ कोटी रुपयांवरून ४५,१६८,४८० कोटी रुपयांवर घसरले, ज्यामुळे गुंतवणूकदारांचे ७.७७ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

**बाजारातील घसरणीची प्रमुख कारणे एफआयआयची विक्री:** परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात सतत विक्री सुरु ठेवली आहे. विश्लेषकांच्या मते, भारतीय बाजार इतर बाजारांच्या तुलनेत प्रीमियमवर व्यापार करत आहे, ज्यामुळे अल्पावधीत तो कमी आकर्षक ठरला आहे. विशेषत: स्मॉलकॅप सेगमेंटमध्ये विक्रीचा दबाव जास्त दिसून आला.

**भारत-अमेरिका व्यापार करारावरील अनिश्चितता :** भारताने युनायटेड किंगडमबरोबर मुक्त व्यापार करार केला असला, तरी भारत-अमेरिका व्यापार करारावरील अनिश्चितता बाजारावर परिणाम करत आहे. १ ऑगस्टची टॅरिफची मुदत जवळ येत असताना, २६% टॅरिफ वाढ टाळण्यासाठी कोणताही ठोस करार झालेला नाही. यामुळे बाजारात अस्थिरता वाढली आहे.

**आयटी आणि एफएमसीजी क्षेत्रातील कमजोरी:** आयटी कंपन्यांच्या निराशाजनक तिमाही निकालांमुळे बाजार आधीच दबावात होता. त्यात ऋबउऋ क्षेत्रातील नेस्ले इंडियाने नफ्यात १३% घसरण (गेल्या वर्षीच्या ७४६.६ कोटींवरून ६४६.६ कोटी) नोंदवली. यामुळे निफ्टी एफएमसीजी निर्देशांक ०.६% घसरणीसह ५४,६४५ च्या नीचांकी पातळीवर पोहोचला. नेस्लेचे समभाग १.८७% घसरणीसह २,२७७ रुपयांवर बंद झाले.

**पुढील काळातील आव्हाने :** बाजारातील तज्ज्ञांच्या मते, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची विक्री, तिमाही निकाल आणि जागतिक व्यापारातील अनिश्चितता यामुळे बाजारावर दबाव कायम राहण्याची शक्यता आहे. गुंतवणूकदारांनी सावधगिरी बाळगत मजबूत मूलभूत तत्त्वे असलेल्या कंपन्यांवर लक्ष केंद्रित करावे, असे विश्लेषकांचे मत आहे. ◆◆◆

## फेक पेमेंट स्क्रीनशॉट म्हणजे काय?

फेक पेमेंट स्क्रिनशॉट म्हणजे बनावट इमेज दाखवून पैसे दिल्याचा आभास निर्माण करून फसवणूक करणे. काही ठकसेन अशा पद्धतीने स्क्रिनशॉट तयार करतात की जणू आर्थिक व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. प्रत्यक्षात मात्र त्यांनी कोणतीही रक्कम ट्रान्सफर केलेली नसते. त्यामुळे संबंधित व्यक्तीचे आर्थिक नुकसान होते. आजकाल अशा प्रकारच्या बनावट स्क्रीनशॉट सहजपणे ऑनलाइन टूल्सच्या माध्यमातून तयार करता येऊ लागल्याने सावधगिरीची जबाबदारी वाढली आहे.




■ माहीत आहे?

**फेक पेमेंट स्क्रीनशॉटची वैशिष्ट्ये**

बनावट माहिती: या प्रकारच्या स्क्रीनशॉटमध्ये व्यवहार क्रमांक, रक्कम, तारीख आणि वेळ यांसारख्या बाबी खोट्या असतात. रिअल टाईम पुष्टी नाही: बँकेकडून किंवा युपीआय प्लॅटफॉर्मकडून कोणतीही थेट पुष्टी प्राप्त होत नाही. कोणताही व्यवहार नोंदलेला नसतो: कारण प्रत्यक्षात अशा कोणत्याही पेमेंटचा व्यवहार झालेलाच नसतो, त्यामुळे प्राप्तकर्त्याच्या खात्यात याचा मागोवा लागत नाही.

फसवणूक करणारे हे बनावट स्क्रीनशॉट कसे वापरतात?

काही दुकानदार अत्यंत गडबडीत असतात आणि प्रत्येक व्यवहार तपासण्याकडे लक्ष देत नाहीत. अशा वेळी फसवणूक करणारे बनावट स्क्रीनशॉट दाखवून माल घेऊन जातात.

अनेक लोक फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडियावर आपला व्यवसाय चालवत असतात. ग्राहकाकडून आलेला पेमेंट स्क्रीनशॉट पाहून ते सेवा किंवा वस्तू देतात, मात्र प्रत्यक्षात पैसे खात्यात येतच नाहीत.

एखादा व्यक्ती दुसऱ्याकडून रोख रक्कम घेतो आणि त्यानंतर बनावट स्क्रीनशॉट दाखवून सांगतो की रक्कम परत ट्रान्सफर केली आहे. यामुळे रोख पैसे दिलेल्या व्यक्तीची फसवणूक होते. एखादा फसवणूक करणारा कॉल करून सांगतो की चुकीने तुमच्या खात्यात पैसे ट्रान्सफर झाले आहेत आणि मग एक फेक स्क्रीनशॉट पाठवून पैसे परत मागतो.

**फसवणूक कशी टाळाल?**

व्यवहाराची खातरजमा करा: कोणताही स्क्रीनशॉट बघितल्यावर लगेच विश्वास ठेवू नका. संबंधित ट्रान्झॅक्शन आयडी आपल्या बँक स्टेटमेंटमध्ये किंवा युपीआय अ‍ॅपमध्ये तपासून पाहा. जर ती माहिती आपल्या व्यवहारामध्ये दिसत नसेल तर पेमेंट झालेले नसते. वेळ तपासा: प्रत्येक व्यवहाराची एक विशिष्ट वेळ असते. त्यामुळे स्क्रीनशॉटवरील वेळ आणि तुमच्या व्यवहाराच्या वेळेमध्ये सुसंगतता आहे की नाही हे तपासा. अनेकदा फसवणूक करणारे जुन्या किंवा चुकीच्या वेळेचा स्क्रीनशॉट तयार करतात. विश्वसनीय प्लॅटफॉर्मचा वापर करा: पेमेंटसाठी जे प्लॅटफॉर्म वापरता ते अधिकृत आणि सुरक्षित असावेत. अशा प्लॅटफॉर्ममध्ये सुरक्षा यंत्रणा मजबूत असतात, त्यामुळे अशा फसवणुकीपासून बचाव होतो. ◆◆◆

## सुरक्षाकवच कायम ठेवून विम्याचा हप्ता कमी करता येतो?

इन्शुरन्स ही प्रत्येक कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षेची गरज असली तरी विमा घेताना सर्वप्रथम प्रीमियम म्हणजेच हप्त्याच्या रकमेवर नजर जाते. अनेक वेळा ही रक्कम भरता न आल्यामुळे पॉलिसी अर्धवट राहते, कव्हर कमी होते किंवा ती रद्द होते. वास्तविक, थोडं स्मार्ट नियोजन केल्यास सुरक्षाकवच चांगले ठेवूनही हप्ता कमी करता येऊ शकतो.

**१. ऑनलाइन पॉलिसी घ्या**

ऑनलाइन विक्रीमुळे इन्शुरन्स कंपन्यांचे वितरण खर्च बरेचसे कमी होतात. त्यामुळे ऑफलाईनच्या तुलनेत ऑनलाइन पॉलिसी तुलनात्मकदृष्ट्या स्वस्त मिळतात. शिवाय, यामध्ये प्रक्रिया पारदर्शक असते आणि ग्राहकाला स्वत:चे पर्याय समजून घेता येतात.

**२. मासिक किंवा त्रैमासिक प्रीमियम पद्धती निवडा**

वर्षाचा हप्ता एकदम भरायचा झाल्यास अनेकांना अडचणी येतात. अशा वेळी मासिक किंवा त्रैमासिक प्रीमियम पद्धत उपयुक्त ठरते. यातून अचानक येणारा मोठा आर्थिक भार टाळता येतो आणि पॉलिसीही चालू राहते.




**३. अतिरिक्त रायडर्सचा फेरविचार करा**

अनेकदा आपण घेतलेल्या पॉलिसीत काही रायडर्स म्हणजेच पूरक लाभ समाविष्ट केलेले असतात, जे प्रत्यक्षात आपल्या गरजांशी फारसे संबंधित नसतात. उदा. क्रिटिकल इलनेस रायडर, हॉस्पिटल कॅश बेनिफिट इ. हे रायडर्स काढून टाकल्यास प्रीमियम लक्षणीय कमी होतो.

**४. को-पे आणि सब-लिमिट्सचा वापर करा :** आरोग्यविषयक पॉलिसी घेताना को-पे (क्लेमचा काही टक्का ग्राहकाने भरायचा) किंवा सब-लिमिट्स (खर्चावर मर्यादा) हे पर्याय स्वीकारल्यास प्रीमियम घटतो. यामध्ये क्लेम करताना काही रक्कम स्वतः भरावी लागते, पण नियमित परिस्थितीत याचा फारसा फटका बसत नाही.

**५. टॉप-अप किंवा सुपर टॉप-अप प्लॅन वापरा**

मूळ पॉलिसीच्या जोडीला कमी दरात अधिक कव्हर मिळवण्यासाठी टॉप-अप किंवा सुपर टॉप-अप योजना फायदेशीर ठरतात. यामध्ये बेसिक पॉलिसीला एका विशिष्ट मर्यादेपर्यंत कव्हर मिळते आणि त्यानंतरचा खर्च टॉप-अपद्वारे कव्हर होतो.

**६. पॉलिसी लवकर घ्या, प्रीमियम कमी ठेवा**

विमा पॉलिसीमध्ये वय जसजसं वाढतं, तसतसा प्रीमियमही वाढतो. त्यामुळे आयुर्विमा किंवा आरोग्यविमा लवकर घेतल्यास, कमी दरात जास्त कालावधीसाठी संरक्षण मिळवता येतं. तरुण वयात घेतलेल्या पॉलिसीत वैद्यकीय तपासणीची गरजही तुलनेत कमी असते.

**७. एकत्रीकरण करून व्यवस्थापन सुलभ करा**

एखाद्याजवळ वेगवेगळ्या कंपन्यांच्या अनेक पॉलिसी असतील, तर त्या एकाच ठिकाणी एकत्र करून व्यवस्थापन सुलभ करता येते. यातून काही प्रमाणात खर्चही वाचतो. उदाहरणार्थ, चार पॉलिसीऐवजी एक कुटुंब पॉलिसी घेतल्यास प्रीमियम कमी होतो, शिवाय कव्हर अधिक सुटसुटीत होते.

**८. आरोग्यदायी जीवनशैलीचा फायदा घ्या**

इन्शुरन्स कंपन्या धूम्रपान करत नाहीत, वजन नियंत्रणात आहे आणि आरोग्य चांगलं आहे, अशा ग्राहकांसाठी कमी प्रिमियम आकारतात. त्यामुळे जीवनशैली सुधारल्यास भविष्यात कमी प्रीमियममध्ये अधिक कव्हर मिळू शकतो.

■ विमाजगत

**९. नेटवर्क हॉस्पिटल्स निवडून प्रीमियम कमी करा**

काही आरोग्यविमा कंपन्या 'स्मार्ट सिलेक्ट' किंवा 'नेटवर्क हॉस्पिटल रेस्ट्रिक्शन' रायडर देतात. यामध्ये ठराविक हॉस्पिटल्समध्ये उपचार घेण्याच्या अटीवर प्रीमियम कमी होतो. हे शहरी ग्राहकांसाठी फायदेशीर ठरू शकते.

**१०. रूम रेंट लिमिट सादर करा :** 'सिंगल प्रायव्हेट एसी रूम'ची मर्यादा ठेवल्यास प्रीमियम कमी होतो. हॉस्पिटलमधील बेड रेटवर मर्यादा घातल्यामुळे कंपन्या खर्चाचा जोखीम भाग कमी करतात आणि प्रीमियम कमी करतात. ◆◆◆

# मावळच्या ऐतिहासिक तिकोना गडावर उसळला शिवभक्तांचा जनसागर

नगर – पुणे जिल्ह्यातील मावळातील ऐतिहासिक तिकोना किल्ल्यावर खासदार निलेश लंके यांच्या संकल्पनेतून आणि आपला मावळा व निलेश लंके प्रतिष्ठानच्या पुढाकारातून गड संवर्धन, स्वच्छता व वृक्षारोपण मोहिम २७ जुलै रोजी उत्साहात पार पडली. मुसळधार पावसातही हजारो शिवप्रेमींनी किल्ला सर करत मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या मोहिमेमध्ये राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे ही उपस्थित होते.

खा. लंके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या दर महिन्याला एक गड उपक्रमांतर्गत तिकोना हा पाचवा गड ठरला. पुणे, मुंबई, नगर जिल्ह्यातील मावळ्यांसह राहुरी तालुक्यातील म्हैसगांव येथून आलेल्या विद्यार्थ्यांनीही मोहिमेत सहभाग नोंदविला. विशेषतः नगर शहरातील ५५ विद्यार्थीनींनी मोहिमेच्या प्रारंभी मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली.

खा. लंके व ४०० मावळे हे २६ जुलै रोजी सायंकाळीच गडाच्या परिसरात मुक्कामी पोहचले होते. मोहिमेला शिवप्रतिज्ञा आणि जिजाऊ वंदनेने प्रारंभ झाला. पावसाच्या अडथळ्यांची पर्वा न करता मावळयांनी गडावर स्वच्छता, झाडांचे संवर्धन, डस्टबिन्स लावणे, वीज तसेच सूचना फलकांची व्यवस्था ही कामे पार पाडली.

### खा. लंके खरं हिंदुत्व मांडत आहेत

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेनेच खा. निलेश लंके हे संपूर्ण महाराष्ट्रात गडसंवर्धनाचे काम करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेले आठरा पगड जातींना बरोबर घेऊन जाणारे खरं हिंदुत्व ते कृतीतून जनतेसमोर मांडत आहेत. असे आ. जयंत पाटील यावेळी म्हणाले.

### खासदार निलेश लंके यांच्या पाचव्या गड-किल्ले संवर्धन मोहिमेस मोठा प्रतिसाद



पुणे जिल्ह्यातील मावळातील ऐतिहासिक तिकोना किल्ल्यावर खा. निलेश लंके यांच्या संकल्पनेतून आणि आपला मावळा व निलेश लंके प्रतिष्ठानच्या पुढाकारातून गड, किल्ले संवर्धन मोहिमेत सहभागी झालेले राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व शिवभक्त.

### खा. लंके यांच्याकडून लोकसहभागातून संवर्धन

तिकोना गडावर येणं हे भाग्य आहे. दिल्लीश्वरांना ही हिंमत झाली नाही. गडकिल्ले वाचविण्यासाठी शासनाची मदत मिळाली नाही तरी खा. निलेश लंके हे लोकसहभागातून गडसंवर्धन करत आहेत. या गडाच्या संवर्धनाचा १० कोटींचा प्रस्ताव प्रलंबित आहे. वनविभागाच्या हद्दीतील पायऱ्यांच्या दुरूस्तीसाठी ४० लाखांच्या प्रस्तावासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत. असे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले.

### गड ही आपली प्रेरणास्थानं

या मोहिमेत कोणताही पक्ष वा पद नाही. सर्व जाती, धर्माचे तरूण या मोहिमेत सहभागी होत आहे. मुस्लीम समाजाचे १०० हून अधिक मावळे या मोहिमेत सहभागी झाले आहेत. गड ही आपली प्रेरणास्थानं आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी सरकारपेक्षा आपणही पावले उचलायला हवीत. या मोहिमेद्वारे गड किल्ल्यांचे महत्व, त्यांचे ऐतिहासिक स्थान, आणि शिवकालीन वारसा पुढील पिढीपर्यंत पोहचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. असे खा.निलेश लंके म्हणाले.

### पुढील मोहिम प्रतापगडावर घ्या

यावेळी बोलताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पुढील मोहिम प्रतापगडावर भवानी मातेच्या आशीर्वादाने राबविण्याचे आवाहन जयंत पाटील आणि खा. नीलेश लंके यांना केले.



जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस उपअधीक्षक जगदीश भांबल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.

## क्रेडिट एक्सेस इंडिया फाऊंडेशनकडून दहावीच्या विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती वाटप

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आधार देण्याचा उपक्रम

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील क्रेडिट एक्सेस इंडिया फॉउंडेशनच्या माध्यमातून क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडच्या (ग्रामीणकुटा) वतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील इयत्ता दहावी (एसएससी) बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस उपअधीक्षक जगदीश भांबल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. या प्रसगी संस्थेचे विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कदम, क्षेत्रीय अधिकारी रविंद्र रकटाटे, शाखाधिकारी अमित कदम आदींसह पालक उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत गुणवत्ताधारक आणि गरजू विद्यार्थिनींना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले. या शिष्यवृत्तीचा आरती इथापे, स्नेहल सोनवणे, अनुष्का सातदिवे, श्यामल ठाणगे, समीक्षा दहातोंडे, साक्षी आव्हाड, अनुजा गर्जे, अक्षदा कदम या विद्यार्थिनीना लाभ मिळाला आहे.

पोलीस उपअधीक्षक जगदीश भांबल यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांचा भवितव्याचा विचार करुन क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

संस्थेचे विभागीय अधिकारी ज्ञानेश्वर कदम यांनी विद्यार्थिनींना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आणि शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

मायक्रो फायनान्स कंपनी असलेल्या क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडने दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळून त्यांना सक्षम आणि स्वावलंबी बनण्यास मदत होणार असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडतर्फे दरवर्षी अशा उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याची यावेळी माहिती देण्यात आली.

## कारमधून देशी-विदेशी दारुची वाहतूक करणारे २ जण पकडले

### पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाची जामखेड रोडवर कारवाई

नगर – विनापरवाना अवैध देशी विदेशी दारुचा साठा कार मधून वाहतूक करणाऱ्या दोघांविरुध्द कारवाई करुन ३ लाख ९९ हजार ५४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने एलआयसी ऑफिस ते जामखेडकडे जाणारे, आर्मी एरियातील रोडवरील चौकात २६ जुलै रोजी केली.

या बाबतची माहिती अशी की पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथक हे भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गस्त घालत असताना त्यांना मिळालेल्या माहितीवरुन,पथकाने एल.आयसी ऑफिस ते जामखेड कडे जाणारे आर्मी एरियातील रोडवर चौकात सापळा लाऊन धनंजय बाबासाहेब बडे (रा. जोगेवाडी ता. पाथर्डी, जि. अ.नगर) संजय दत्तू चौधरी (वय ३८ वर्षे रा. कारखेल ता. आष्टी जि.बीड) यांना त्यांचे ताब्यातील पांढऱ्या रंगाचे स्विप्ट कार (क्र. एम एच ०१ ए आर १३००) सह थांबवले. पोलिसांनी दोघांची व वाहनाची झडती घेतली असता ४९ हजार ५४० रुपये किंमतीचा वेगवेगळ्या कंपनीच्या देशी विदेशी दारुच्या बाटल्या दिसून आल्या. त्यामुळे पोलिसांनी या दारूसह ३ लाख ५० हजार रुपये किंमतीची कार असा एकूण ३ लाख ९९ हजार ५४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोघाविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथकातील पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस हवालदार शंकर चौधरी, दिगंबर कारखेले, मल्लिकार्जुन बनकर, अजय साठे, सुनिल पवार, उमेश खेडकर, अरविंद भिंगारदिवे, दिनेश मोरे, पोलीस अंमलदार सुनिल दिघे, अमोल कांबळे, संभाजी बोराडे, विजय ढाकणे, दिपक जाधव, जालिंदर दहिफळे यांचे पथकाने केली आहे.



ज्येष्ठ नागरिक मंच सभागृह सावेडी येथे कथाकथन कार्यक्रमामध्ये सहभागी झालेले मंचचे पदाधिकारी व सदस्य.

## कथाकथनमध्ये रंगले ज्येष्ठ नागरिक

नगर – ज्येष्ठ नागरिक मंचाने ज्येष्ठ नागरिक मंच सभागृह सावेडी येथे कथाकथन कार्यक्रम आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी मंचाचे अध्यक्ष शरद कुलकर्णी हे होते. त्यांच्या समवेत कार्यवाह सौ. ज्योती केसकर होत्या. प्रमुख पाहुणे कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन करण्यात आले.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना शरद कुलकर्णी म्हणाले 'मंचा तर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातात. त्यातून मनोरंजना बरोबर उद्बोधन, स्नेहसंवर्धन होत असते. मंचातर्फे समाजामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना ज्ञान विज्ञान पुरस्कार, ऋषी तज्ञ व्यक्तींचा सन्मान, स्नेहसंमेलन, वर्षासहल, भक्ती संगीत, प्रबोधनात्मक संस्कृती वृद्धिंगत करणारे कार्यक्रम आयोजित केले जातात.'

याप्रसंगी बाळासाहेब देशमुख यांनी, नात आणि आजोबा यांच्या 'घट्ट नात्याची कथा' , 'पापी पेट का सवाल है' , 'भाव भक्तीचा तो भुकेला' या कथा सादर केल्या. 'घट्ट नात्याची गोष्ट' या कथेतील नात, पक्षाची वाणी, पक्षाची गाणी गात, बडबड करत, शंका प्रश्नोत्तरे विचारत, आजोबांना भांडावून सोडते. तुम्हाला गणपतीची आरती येते का? या प्रश्नाने आजोबा गांगरून जात म्हणतात, सगळे म्हणायला लागले की, मग मला आरती म्हणता येते. पण मला एकट्याला म्हणायला लावले, की नाही म्हणता येत. मातीचा सुगंध असलेले अत्तर, बाजारात का मिळत नाही? या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांची त्रेधा तिरपीट उडत राहते. 'पापी पेट का सवाल है' या कथेतून दुष्काळग्रस्त शेतकरी, पावसाभावी शहरात जाऊन, रसवंती गृह चालवतो. त्याच्यावर आलेल्या संकटातून, तो कशी मात करतो? यावरती भाष्य करत, ग्रामीण जीवनाचे वास्तववादी कंगोरे दाखविले.

'भाव भक्तीचा तो भुकेला' या कथेद्वारे पंढरपूरच्या वारकऱ्यांचा सन्मान करत, अन्नदान करणाऱ्या, वसुधाच्या भावभक्तीची कथा सांगत, परमात्मा कसा दर्शन घेऊन जातो, हे विशद केले.

सअभिनय, देहबोली, स्पष्ट उच्चार, याद्वारे सादर केलेल्या कथाकथन मध्ये सर्व ज्येष्ठ नागरिक तुडुंब न्हावून निघाले, रंगून गेले.

ज्योती केसकर यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय पुष्पा चितांबर यांनी करून दिला. सूत्रसंचालन बाजीराव जाधव यांनी मार्मिक शब्दात केले. या प्रसंगी शिवप्रसाद जोशी, मोरेश्वर मुळे, स्नेहल वेलणकर, संतोष गोरे, हर्षवर्धन थिगळे, सौ. जहागीरदार उपस्थित होते.

# सुरक्षा रक्षकाला लाकडी फळीने केली बेदम मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – गेटसमोर वाद घालू नका असे म्हटल्याचा राग आल्याने एकाने ऑफिस मध्ये घुसून सुरक्षा रक्षकाला लाकडी फळीने डोक्यावर, तोंडावर, पायावर बेदम मारहाण केली. ही घटना २७ जुलै रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास सावेडी परिसरातील बिगबाजार शेजारील, कांकरिया कन्ट्रक्शन्सच्या बांधकाम साइटवर घडली.

याबाबत सुरक्षारक्षक संजय बाबुराव पटारे (वय ६२, रा. यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी हे बिगबाजार शेजारील कांकरिया कन्स्ट्रक्शनच्या बांधकाम साईटवर वॉचमन म्हणून काम पाहत असताना, गेटसमोर दोन व्यक्तींमध्ये वाद चालू होता. यावेळी फिर्यादी यांनी हस्तक्षेप करत येथे वाद घालू नका, असे सांगितले. मात्र या बोलण्याचा राग आल्याने दीपक तुकाराम शिंदे (रा.गॅस गोडाऊनसमोर, पाईपलाईन रोड, अ.नगर) याने संतापाच्या भरात तेथे पडलेली लाकडी फळी उचलली व थेट ऑफिसमध्ये घुसून फळीने फिर्यादी यांच्या डोक्यावर, तोंडावर व डाव्या पायावर मारहाण केली. या हल्ल्यात पटारे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हल्ला केल्यानंतर दीपक शिंदे घटनास्थळावरुन पसार झालाअसून या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध भा.दं.वि. ११५ (२), ११८ (१) कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार लबडे करत आहेत.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत संस्थेने मुळ सभासद तुकाराम विश्राम बनसोडे यांना वाटप केलेली होती परंतु **तुकाराम विश्राम बनसोडे** हे मयत असून यांचे कायदेशीर वारस **१. नंदा तुकाराम बनसोडे (पत्नी)** रा. गौरवनगर, फकिरवाडा, अहमदनगर **२. दिपक तुकाराम बनसोडे (मुलगा)** रा. घर नं. ए/२१, साई पुजा बाग, फेज - २, पुणे सिटी, अकुर्डी, पुणे, **३. विद्याधर तुकाराम बनसोडे (मुलगा)** रा, श्रीपाल भारती बिल्डींग नं. १, युनिटेक रोड, विरार वेस्ट, वसई, ठाणे ४. **रविंद्र तुकाराम आनंद (मुलगा)** रा. ए/६, सेकंड फ्लोर, खार, वेस्ट मुंबई याप्रमाणे असून याशिवाय मयत तुकाराम विश्राम बनसोडे यांना इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत याप्रमाणे कायदेशीर वारसांचे म्हणणे आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर झालेला आहे व सदर मिळकतीचे लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, कायदेशीर वारसा हक्क, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.
**दि.२८/०७/२०२५.**

**परिशिष्ट : १) मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका नगर पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर),
महानगरपालिका हद्दीतील, **मौजे भिंगार** येथील खालील वर्णनाची मिळकत-

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३४७/२ ब | १४ | ३०१.०० चौ.मी. |

सदर प्लॉट मध्ये मंजुर प्लॅन प्रमाणे लोडबेरींगमध्ये बांधकाम झालेल्या मनिषा रो हौसिंग सोसायटी मधील लिहून देणार यांचे मालकीचा रो हौसिंग ब्लॉक नं. १०९ असून याचे प्लॉटचे क्षेत्र ३७-१७ चौ.मी असुन तळ मजल्यावर दोन रुम, संडास बाथरुम असे बांधकाम झालेले असुन सदर बांधकामाचे क्षेत्र २३- ४२ चौ.मी. असुन बाकीची मागे पुढे खुली जागा मिळकतीबाबत.

**यासी चतु :सिमा- पुर्वेस - रस्ता दक्षिणेस - ब्लॉक नं. ११०**
**पश्चिमेस - ब्लॉकनं. ९८ उत्तरेस - ब्लॉक नं. १०८**

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक
काही एक राखुन न ठेविता.

**ॲड.तनवीर एम.शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
डावरे गल्ली, अहमदनगर, मो.नं. 9270464600


## खात्यात चुकून जमा झालेली रक्कम व्यापाऱ्याने मर्चंट बँकेला केली परत

नगर – खात्यात चुकून जमा झालेली रक्कम व्यापाऱ्याने मर्चंट बँकेला परत केली. वस्तुपाल मिश्रीलाल गांधी यांचे 'मे. महावीर एम्पोरीयम' खिस्तगल्ली या नावाने चालू खाते मर्चंट बँक कापड बाजार शाखेत वापरात आहे.



वस्तुपाल गांधी

सदरील खात्यामध्ये चुकून मे. गोल्ड स्टार इलेक्ट्रीकल इलेक्ट्रॉनिकस प्रो. प्रा. बाळासाहेब उगले एमआयडीसी यांचे रक्कम रू.३७,५११ ची २१ जुलै रोजी आरटीजीएस द्वारा जमा (वर्ग) झालेली होती, ती रक्कम श्री. गांधी यांनी बँकेत परत केली आहे. त्या बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## छावनी परिषद पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेत विद्यार्थ्यांचे अनुकरणीय मतदान आयोजन



भिंगार – पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेत विद्यार्थ्यांसाठी मतदान प्रक्रियेचे प्रात्यक्षिक आयोजन करण्यात आले. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना लोकशाही प्रणाली व निवडणूक प्रक्रियेची सखोल माहिती व्हावी, या उद्देशाने घेण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग दिसून आला. या विशेष कार्यक्रमात निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे प्रत्यक्ष पद्धतीने राबवण्यात आली. मुख्याध्यापक संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान अधिकारी म्हणून सायली लेंडे, लता पाटील, सोन्याबापू लबडे, सुभाष भारूड, महेश मोहिते, स्नेहल लवांडे व सीमा चोभे यांनी आपली जबाबदारी पार पाडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संजय हजारे व जी. आय. शेख यांनी कार्य पाहिले.

या निवडणुकीसाठी पात्रता ठरवताना इयत्ता ८ वीतील विद्यार्थी, मागील वर्षातील सर्वाधिक उपस्थिती आणि मागील इयत्तेत किमान ८०% गुण असणे असे निकष लावण्यात आले. त्यानुसार भाग्यश्री जोशी, वेदांत साबळे, साक्षी आयनूर आणि रूद्र अडागळे हे चार उमेदवार रिंगणात उतरले.

निवडणूक प्रक्रियेतील पुढील बाबी विद्यार्थ्यांनी समजून घेतल्या.

उमेदवारांचे नामांकन फॉर्म भरणे, सुचक व अनुमोदकांची निवड, उमेदवाराची माघार प्रक्रिया, उमेदवारांना चिन्ह वाटप, प्रचारासाठी वक्तृत्व व पोस्टरद्वारे जनजागृती, मतदान केंद्राची स्थापना व सजावट, मतदान कक्षात रबरी फुली, मतपेटी व मतपत्रिकेचा वापर, मतदानानंतर मोजणी प्रक्रिया आणि निकाल जाहीर

अशा साऱ्या टप्प्यांतून विद्यार्थी अगदी खर्या निवडणुकीप्रमाणे सहभागी झाले. मतदारांच्या यादीपासून मतपत्रिकेपर्यंत सर्व बाबी विद्यार्थ्यांनी स्वतः समजून घेतल्या व अनुभवाच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची जाणीव होण्यास मदत झाली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक म्हणून घडवण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल ठरला. विद्यार्थ्यांनी मतदान प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न विचारून आपले कुतूहल व्यक्त केले. उपस्थित शिक्षकवृंद आणि मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

हा उपक्रम शाळेतील लोकशाही शिक्षणाचा आदर्श ठरला असून भविष्यातील जबाबदार नागरिक घडवण्यास निश्चितच मदत होईल, असे मत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे यांनी व्यक्त केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २८/०७/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, **मौजे केडगाव** येथील **सर्व्हे नंबर ४६०/४८०/४८१/४८३/४८४/४८८ मधील** खालील वर्णनाच्या प्लॉट मिळकती -

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | यांसी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ५९ | १६५.०० चौ.मी | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं.५८ | प्लॉट नं.७२ | प्लॉट नं.६० |
| ६० | १६५.०० चौ.मी. | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं.५९ | प्लॉट नं.७१ | प्लॉट नं.६१ |
| ६१ | १६५.०० चौ.मी. | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं.६० | प्लॉट नं.७० | प्लॉट नं.६२ |
| ६२ | १६५.०० चौ.मी. | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं.६१ | प्लॉट नं.६९ | प्लॉट नं.६३ |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक**
**अनुराधा तुकाराम वराट**
रा.जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,
अहिल्यानगर

**ॲड. आर.टी.शर्मा**
मो.नं.९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४, १७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉट मिळकत विद्यमान मालक **श्री. पांडुरंग पंढरीनाथ ठुबे व आनंदी पांडुरंग ठुबे, दोघे रा. श्री गणेश बंगला, नगर-पुणे रोड, ओम मंगल कार्यालय समोर, माणिक नगर, अहमदनगर** यांचे मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशीला बरोबर झालेला असून लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे, व सदर व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडुन विद्यमान मालकाने विसार स्वरुपात खुप मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. सदर प्लॉट मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे चालू वाद, साठेखत, खरेदीखत, मालकीहक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईट्स व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही **नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**सर्व्हे नं.१०६/१ मधील प्लॉट नं. १३ चे एकुण क्षेत्र ८९.६६ चौ.मी. व सर्व्हे नं. १०६/१ मधील प्लॉट नं.१४ चे एकुण क्षेत्र ९३.२२ चौ.मी. संपूर्ण प्लॉट मिळकती बाबत.**

**सर्व्हे नं.१०६/१ मधील प्लॉट नं. १३ यांसी चतु:सिमा -**
**पुर्वेस - ६.०० मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस :- प्लॉट नं. १४**
**पश्चिमेस :- प्लॉट नं. ८ उत्तरेस :- प्लॉट नं. १२**
**सर्व्हे नं.१०६/१ मधील प्लॉट नं. १४ यांसी चतु:सिमा -**
**पुर्वेस :- ६.०० मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस :- प्लॉट नं. १५**
**पश्चिमेस :- प्लॉट नं. ८ व ९ उत्तरेस :- प्लॉट नं. १३**

**दि. २८/०७/२०२५**
**अहिल्यानगर**

**पद्मसिंह पांडुरंग ठुबे**

**ॲड.राहुल शंकरराव हिरणवाळे**
शिवशक्ती प्रिंटींग प्रेस, जूनी वसंत टॉकीज समोर, माळीवाडा
अहमदनगर, मो 8805755620


## अनन्या वैकरने सांगितले अमेरिकेतील वास्तव्याचे अनुभव



अमेरिकेला जावून आलेली अहिल्यानगरची कन्या कु.अनन्या वैकर हिचा येथील महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर विद्यालयात सत्कार करताना मुख्याध्यापिका विभावरी रोकडे. समवेत निलेश वैकर, सौ. भावना वैकर.

नगर – अहिल्यानगरची कन्या कु. अनन्या वैकर ही विद्यार्थिनी रोटरी स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्रॅमच्या माध्यमातून एक वर्ष अमेरिकेमध्ये वास्तव्यास होती. त्यानिमित्त रोटरी क्लबच्या या उपक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी तसेच अमेरिकन जीवनशैली व शिक्षण पद्धतीचा शालेय विद्यार्थ्यांना परिचय व्हावा यासाठी तिचा येथील महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर विद्यालयात सत्कार समारंभ आयोजित केला होता.

यावेळी बोलताना अनन्याने तिचा अमेरिका प्रवास, तेथील कुटुंबासमवेत वास्तव्यादरम्यानचे विविध अनुभव, शालेय अभ्यासक्रम, शिक्षण पद्धती आणि भारत व अमेरिकन जीवनशैलीतील फरकाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. अभ्यासक्रम आणि भौतिक सुविधांमध्ये अमेरिका अग्रेसर असला तरी कौटुंबिक स्नेहबंध, सांस्कृतिक परंपरा आणि मानसिक जडणघडणीच्या बाबतीत भारतच सरस असल्याचे प्रतिपादन तिने केले. शालेय विद्यार्थ्यांच्या बालसुलभ, रंजक प्रश्नांची दिलखुलास उत्तरे यावेळी अनन्याने दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे होत्या. यावेळी व्यासपीठावर नव विद्या प्रसारक मंडळाचे मानद सचिव निलेश वैकर, प्रा.भावना वैकर, पर्यवेक्षिका मंदा शिंदे आदी उपस्थित होते.

रोटरियन निलेश वैकर यांनी रोटरी क्लबच्या शालेय शिक्षण आणि विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

भावना वैकर यांनी स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्रामअंतर्गत त्यांनी पालकत्व स्विकारलेल्या अमेरिकन विद्यार्थिनी सोबतचे विविध अनुभव उपस्थितांना सांगितले. प्रशांत कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

